# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## गृहपाठ

### बी.ए. समाजशास्त्र

### प्रथम वर्ष (सत्र १ व सत्र २)

### २०१५-१६

प्रती :

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी.ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०-२५ ओळीत उत्तरे असावे.

५. उत्तरात गरज नसताना १,२,३ ......... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र १ व सत्र २ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'क्षेत्रिय कार्य' अथवा उपक्रम हा प्रश्न घालण्यात आला आहे. त्यासाठी अवांतर वाचन व सद्य:स्थितीतील घडामोडींचे निरीक्षण आवश्यक आहे.

**गृहपाठ सादर करण्याची मुदत**

| सत्र | विना विलंबशुल्क | विलंब शुल्कासह |
|---|---|---|
| पहिले | **३१ ऑक्टोबर २०१५** | **१५ नोव्हेंबर २०१५** |
| दुसरे | **१५ मार्च २०१६** | **३१ मार्च २०१६** |

# बी.ए. (समाजशास्त्र)

## सत्र – १

❖ सूचना : **Communication Skills. (BAE - 101)** किंवा व्यावहारिक मराठी **(BAM - 101)** यापैकी तुम्ही निवडलेल्या विषयाचे गृहपाठ लिहा.

## Communication Skills. (BAE - 101)

### Home Assignment – I (Activities):-

**Q.1) Field work (any one)** **(Marks : 20)**

a) Read any other book written by Abdul Kalam.
Write a review (30-40 lines).

1) Style of writing.
2) Plot of the story.
3) Protagonists in the stories.
4) Morals in the stories

**OR**

b) Select two more male Indian writers and give a short biography of both the writers.

**OR**

c) Describe the earthquake that took place in Nepal.

1) References from the newspaper. (cuttings of news papers)
2) After effects of the disaster
3) Causes of the disaster
4) How to avoid such disasters? (Remedial measures)
5) Do you call this as a man made or a natural disaster? Why?

### Home Assignment – II (Communication Skill:-Chapter 1 and Chapter 2):-

**A) Write short notes on the following. (Any two)** **(Marks : 10)**

1) Classification of Business Communication.
2) External Communication.
3) Elements of communication.
4) Distractions.

**B) Answer in brief (any two)** **(Marks : 10)**

1) Explain the communication cycle in brief.
2) Which are the barriers of communication?
3) Define upward communication.
4) What is vertical communication?

**Home Assignment – III(Communication Skill:-Chapter 3 and Chapter 4):-**

**Q.2.A) Write short notes on the following. (Any two) (Marks : 10)**

1) The Medium of communication.
2) Accuracy.
3) Types of communication.
4) Silence.

**B) Answer in brief (any two) (Marks : 10)**

1) What is Paralanguage?
2) What are the Functions of non verbal Communication?
3) What is written communication?
4) What is Relevance?

**Home Assignment – IV Communication Skill:-Chapter 5 to Chapter 9**

**Q.3.A) Write short notes on the following. (Any two) (Marks : 10)**

1) The techniques of Delivery of Speech.
2) Listening and Hearing.
3) The types of Body Language.
4) Facial Expressions.

**B) Answer in brief (any two) (Marks : 10)**

1) Prepare a chart of "Board Of Directors".
2) What is indented style?
3) Write a note on video conferencing.
4) Write a note on Dyadic Communication.

-----------

# व्यावहारिक मराठी (BAM - 101)

**गृहपाठ १ : दिलेल्या मुद्दांच्या आधारे चारपैकी एका विषयावर निबंध लिहा.** (गुण : २०)

**१) स्त्री शिक्षण- स्त्रीमुक्तीचे आयुध**

प्रस्तावना- महात्मा फुले '' जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी'' या विचारसरणीचा अर्थ- याविषयी ५ ते ७ ओळी.

पूर्वीच्या स्त्री- तंत्रज्ञानामुळे वेळेची बचत, स्त्री शिक्षण कुटुंबाचा, देशाचा राष्ट्राचा विकास.- स्त्रीशिक्षणाची प्रेरणा देणारे समाजसुधारक- म.फुले, महर्षी कर्वे, डॉ.आंबेडकर- सामाजिक दृष्टिकोन- प्रगतीशील स्त्रियां- आजच्या काळात स्त्री शिक्षणाला असणारे महत्त्व- स्त्री स्वावलंबी- यशस्वी स्त्रियांची उदाहरणे- स्त्री-पुरुष समानता- शिक्षणाला दिलेल्या उपमा- तिसरा डोळा, वाघिणीचे दूध.

समारोप : शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही.- म्हणून स्त्रीशिक्षण हेच स्त्री मुक्तीचे आयुध (ठाम मत) ३ ते ५ ओळी.

**२) आजचा विद्यार्थी : परीक्षार्थी की ज्ञानार्थी**

प्रस्तावना- विद्यार्थी म्हणजे कोण? पूर्वीची शिक्षणपद्धती व आजची शिक्षण पध्दती यातील फरक याविषयी ५ ते ७ ओळी.

आजची शिक्षणपध्दती- पाठीवर ओझे- क्लासच्या साखळीमध्ये अडकलेला- मार्काचे टेन्शन म्हणून प्रसंगी कॉपी करणारा- 'मोबाईल' सारख्या तांत्रिक गोष्टीत रस असणारा पाठांतराची सवय नसलेला- 'बे' चे पाढे न येणारा पूर्वीच्या शाळा- मास्तर- शिक्षण- सर्व काही तोंडपाठ. म्हणून म्हणतात ''पूर्वीची चौथी ती आताची दहावी''- उदा. टिळक-आगरकर-विवेकानंद-डॉ.आंबेडकर- आजचे शिक्षक- पूर्वीचे शिक्षक फरक- शिक्षांमध्ये फरक आजचे शिक्षण पोटापाण्यासाठी (उदरनिर्वाहासाठी) उपयोगी पडते का? यावर तुमचे मत मांडा- यातून विद्यार्थी परीक्षार्थी बनत गेला.

समारोप : एकीकडे ज्ञान मिळविण्यासाठी धडपड करणारे विद्यार्थी तर दुसरीकडे पैसा व वशिला यांच्या जोरावर शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यातल्या तफावतीचे चित्र, विद्यार्थी, ज्ञानार्थी बनण्यासाठी उपाययोजना असे ३ ते ५ ओळी.

**३) बसस्थानकावरील एक तास**

प्रस्तावना : तुम्ही कोठे जाण्यासाठी कोणत्या बसस्थानकावर थांबला होता- सूचना एक तास बस (लेट) उशिरा- याविषयी ५ ते ७ ओळी.

सुरुवातीला खूप कंटाळा- आजूबाजूचे निरीक्षण- बसचे येणे-जाणे- बसस्थानकावरील गर्दी- प्रवासासाठी चाललेली माणसे- त्यांना निरोप देणारी माणसे. जागा मिळविण्यासाठी प्रत्येकाची चाललेली धडपड- ढकलाढकली आवाज, गोंगाट, बसस्थानक नियंत्रण कक्षातून दिल्या जाणाऱ्या सूचना- लहान मुले- वृद्ध माणसे- सर्वांच्या चेहऱ्यावरचे हावभाव- त्यांचे बोलणे वाट पाहणे व त्रासणे या सर्व गोष्टींचे वर्णन.

समारोप : या सर्व निरीक्षणात एक तास कधी निघून गेला हे आईने बस आल्याचे सांगताच मग समजले. ३ ते ५ ओळी

**४) एका हुंडाबळीचे आत्मकथन**

प्रस्तावना : एके दिवशी लाजत-मुरडत, सासरी आलेली, दागिन्यांनी मढलेली मी! आज माझे अस्तित्व पुसले गेले. नराधमांच्या विवाहरुपी तावडीत सापडून माझे सोन्यासारखे आयुष्य मातीमोल झाले. अशी एका तरुणीची कहाणीने सुरुवात. ५ ते ७ ओळी.

त्या तरुणीचे पूर्वायुष्य वर्णन- तिचे शिक्षण- गरीबीत जीवन खस्ता- तिने घेतलेले कष्ट- त्यानंतर तिचे लग्न- सुरुवातीला सासरच्या मंडळींनी दाखविलेला मोठेपणा! उदा. देऊन स्पष्ट करणे नंतर त्रास- तिच्याकडे केलेली

सोन्याची, वस्तूची, पैशांची मागणी- ते न आणल्याने माहेरच्या माणसांचा उद्धार- तिला केली जाणारी मारहाण- त्यानंतर एक दिवस घेतलेला तिचा बळी- स्टोव्हचा उडालेला भडका- त्यात मृत्यूमुखी पडलेली ती तरुणी- पोलीसकेस- आई-वडील गरीबीने गांजलेले सासरच्या दबावाला बळी- यांना शिक्षा ही केलीच पाहिजे.
समारोप- नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोला समाज सावध करतो. असे ३ ते ५ ओळी.

**गृहपाठ २ : वृत्तपत्र, आकाशवाणी व दूरदर्शन या तिन्ही प्रसारमाध्यमातील जाहिरातीचे एक-एक उदाहरण द्या. (प्रत्येक माध्यम वेगळे असल्यामुळे माध्यमानुसार जाहिरात लिहावी.) (गुण : २०)**

१) सुवर्ण अलंकार (ज्वेलर्स)
२) सौंदर्यप्रसाधने
३) जनता सहकारी बँक - घरासाठी कर्जव्यवस्था

१) सुवर्ण अलंकार : सोन्याच्या दुकानाचे नाव- ठिकाण- वेळ- वैशिष्ट्ये- संवाद- भाषा- लग्नसराई- गुरुपुष्पामृत दिवस- सणानिमित्त सूट इ.

२) सौंदर्यप्रसाधने : नाव- वैशिष्ट्य- वेगळेपण- गरज सूट इ.

१) घरासाठी (लोन) कर्जव्यवस्था- जनता सहकारी बँक. बँकेचे नाव- ठिकाण- कर्जव्यवस्था- व्याजदर- बँकेची वैशिष्ट्ये- जनसुविधा- सुरळीत हप्ते- अल्पव्याज दर इ.

**गृहपाठ ३ : दिलेल्या उताऱ्याचा १/३ (सारांश) करून उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. (गुण : १०)**

विवेकसिधू अस्तित्वात येण्यापूर्वी वेदांतविषयक ज्ञान, आध्यात्मिक विषय हे संस्कृत भाषेत सांगितले जात असत. त्यामुळे ते समजून घेणे व त्यातील ब्रह्मानंद अनुभवणे, या गोष्टी पंडित वर्गालाच शक्य होत. बौदध् धर्मने पालीचा किंवा जैन धर्माने अर्धमागधी वगैरे प्राकृतचा वापर सुरुवातीला केला असला, तरी उत्तरकालात त्यांनाही पुन्हा संस्कृतचा वापर करावा लागला. या पारंपरिक प्रथेपासून बाजूला जाऊन मुकुंदराजांनी संस्कृत बरोबर मराठीचाही अवलंब केला. त्यांनी ब्रह्मज्ञानाचे विवरण संस्कृत व मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये केले. हा ग्रंथ संस्कृतमध्ये ‘महाभाष्य, ब्रह्मावबोध, विवेकसिंधु, परमार्थबोध तत्वबोध इ. नावांनी प्रसिद्ध आहे. मराठीमध्ये ‘विवेकसंधु’ या नावाने तो ओळखला जातो. उपनिषदांचे मंथन करून मुकुंदराजांनी हा ग्रंथ निर्माण केला. जे लोक शास्त्र जाणत नाहीत, अशा भाविक लोकांसाठी मऱ्हाटी भाषेतून ही ग्रंथरचना झाली. या ग्रंथाची भाषा मराठी असली, तरी त्यात परब्रह्मरसाची झळाळी आहे. ती तात्काळ ज्ञानप्राप्ती करून देणारी आहे, असे स्वत: ग्रंथकर्त्याने नमूद केले आहे.

**गृहपाठ ४ : तुम्ही एखाद्या कॉलेजमधून १२ वी (एच.एस.सी.) ची परीक्षा उत्तीर्ण झाला आहात. त्या कॉलेजमधून टी.सी. मिळणेबाबत अर्ज लिहा. (गुण : १०)**

१) संपूर्ण नाव, पत्ता, फोन
२) प्रति, मा.प्राचार्य, कॉलेजचे नाव, स्थळ
३) विषय :
कोणत्या कॉलेजमध्ये प्रवेश घेणार आहे. त्यासाठी टी.सी. मिळावा म्हणून विनंती.
कोणत्या साली रेग्युलर म्हणून कोणत्या वर्गात शिकत होते. माझा रोल नं. . . . . . हा होता.
कळावे.

आपली विश्वासू
सही
(          )

**गृहपाठ ५.** **उपक्रम (क्षेत्रीय कार्य)** **(गुण : २०)**

**उपक्रम करा. (३ पैकी १)**

**१) कार्यालयीन टिप्पणीची माहिती देऊन कार्यालयीन टिप्पणीचा नमुना तयार करा.**

कार्यालयात आलेली पत्रे- नंतर ती कोठे पाठवली- दिनांक- कार्यालयाचा शिक्का- आवक क्रमांक- तातडीचे असे अग्रक्रम.

एखाद्या पत्रासंबंधी लेखी स्वरुपात नोंदविलेले मत किंवा अभिप्राय म्हणजे टिप्पणी.

टिप्पणी लेखनाचा हेतू- टिप्पणी लेखनाचे प्रकार- नित्याच्या स्वरुपाची, माहितीपर, कार्यवाहीपर प्रत्यक्ष टिप्पणीलेखनाचे १ उदाहरण आवश्यक.

**२) इतिवृत्तलेखनाचे स्वरुप, हेतू, प्रकार सांगून (प्रत्यक्ष लेखन पद्धतीवर) उदाहरणार्थ एका इतिवृत्ताचा नमुना तयार करा.**

इतिवृत्त म्हणजे काय? त्याचे स्वरुप- हेतू- इतिवृत्ताचे प्रकार अहवालात्मक इतिवृत्त २) सामान्य इतिवृत्त ३) वर्णनात्मक इतिवृत्त ४) माहितीपर इतिवृत्त ५) चिकित्सक इतिवृत्त ६) वृत्तान्तात्मक इतिवृत्त

इतिहासाचे उदाहरण द्या.

**३) घोषणात्मक /निविदा/माहितीपत्रक या तीनपैकी एका विषयाची माहिती देऊन त्याचा एक नमुना तयार करा.**

१) घोषणापत्रकाविषयी माहिती व नमुना

किंवा

२) निविदाविषयी माहिती व निविदाचा नमुना

किंवा

३) माहितीपत्रकाविषयी टिपण व माहितीपत्रकाचा नमुना

-------------

# सक्तीचे विषय

## भारतातील सामाजिक समस्या (भाग १) (SC - 101)

### प्रकरण क्रमांक १ ते ६

**प्रश्न १- सामाजिक समस्या म्हणजे काय? सामाजिक समस्यांच्या निर्मिती विषयीचे विविध दृष्टिकोन स्पष्ट करा. (गुण : १५)**

प्रास्ताविक- मानवी जीवनात अनेक समस्या निर्माण होतात. परंतु त्या सर्वांनाच सामाजिक समस्या म्हणता येणार नाही.

सामाजिक समस्या- समाजशास्त्रज्ञांनी केलेली व्याख्या. सामाजिक समस्यांच्या निर्मितीविषयी दृष्टिकोन- सामाजिक विघटनावर भर देणार दृष्टिकोन, वैयक्तिक विघटनावर भर देणारा दृष्टिकोन, प्रमाणकशून्य दृष्टिकोन, मूल्यसंघर्षाचा दृष्टिकोन. समारोप.

**प्रश्न २- दारिद्र्य व बेकारी म्हणजे काय? भारतातील दारिद्र्य व बेकारीची कारणे लिहा. (गुण : १५)**

प्रास्ताविक- दारिद्र्य व बेकारी या भारतातील गंभीर समस्या या दोन्ही समस्या परस्पर संबंधीत.

दारिद्र्य व बेकारी अर्थ व व्याख्या. भारतातील दारिद्र्य व बेकारीची कारणे- ब्रिटीशांचे धोरण, प्रचंड लोकसंख्या वाढ, उत्पन्न वितरणातील असमानता, शेतमजुरांचा प्रश्न, नियोजनातील अपयश, वाढती महागाई, आजारी उद्योगांची समस्या, आर्थिक कमकुवतपणामुळे आलेली सामाजिक व मानसीक दुर्बलता, भारतीय समाजातील लोकांचा दैववादी दृष्टिकोन. समारोप.

**प्रश्न ३- पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (गुण : १५)**

**१) पारंपरिक भारतीय समाजात सामाजिक समस्यांचे प्रमाण कमी का होते?**

पारंपरिक भारतीय समाजातील सामाजिक, शिक्षण, राजकीय, आर्थिक व्यवस्था. समाज नियंत्रणाची साधने प्रभावी, सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्था स्थितीशील त्यामुळे परिवर्तनाचा वेग मंद. त्यामुळे सामाजिक समस्यांचे प्रमाण अत्यल्प.

**२) लोकसंख्यावाढीमुळे निर्माण झालेल्या समस्या सांगा.**

समस्या- आर्थिक समस्या- दारिद्र्य, बेकारीत वाढ, नैसर्गिक साधनसंपत्तीचा तुटवडा, झोपडपट्ट्यांची वाढ, प्रदूषणाची समस्या, सर्वांसाठी शिक्षण हे उद्दिष्ट साध्य होण्यास अडथळे, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई सामाजिक समस्या- सामाजिकीकरण, नियंत्रणाच्या समस्या, कुटुंब विघटनास चालना, निराधार व वृध्दांच्या समस्या, शहीरकरणामुळे समस्या राजकीय समस्या- सामाजिक सुरक्षितता व नियंत्रणाचा शासनावर ताण, भ्रष्टाचार, अतिरेकी संघटना निर्माण, त्याचे शासन पध्दतीच्या रुपरेषेवर दूरगामी परिणाम

**३) घटस्फोटाचे दुष्परिणाम लिहा.**

दुष्परिणाम- कौटुंबिक जीवन विस्कळीत, समाजजीवनात अस्थिरता, मुलांची आबाळ, व्यक्ति विघटन

**४) वेश्या व्यवसायाची कारणे लिहा.**

विविध सामाजिक, आर्थिक, धार्मिक, मानसीक व जैविक कारणे. वेश्यांच्या मुलींचा समाजाने केलेला अस्वीकार, देशी, आंतर्देशीय पातळीवरील अनैतिक व्यापार, लैंगिक संबंधांबाबत स्त्री-पुरुषांच्या बाबत वेगवेगळी मुल्ये, दारिद्र्य, एकत्र कुटुंबाचा ऱ्हास व हुंडा पध्दती, लैंगिक विषयाचे अज्ञान, शारीरीक, मानसीक व्यंग, अनिष्ट धार्मिक रुढी, शिक्कामोर्तब, दलित स्त्रियांच्या दर्जात देवदासी झाल्याने वाढ.

**प्रश्न ४- टिपा लिहा. (कोणत्याही दोन)** **(गुण : १५)**

**१) शीघ्र सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक समस्या**

शीघ्र परिवर्तनामुळे विविध सामाजिक समस्या निर्माण होतात. नेल्सन रॅमले यांचे विचार, ऑगबर्न यांचा सांस्कृतिक पाश्चायनाचा सिध्दांत.

**२) स्थलांतरास कारणीभूत घटक**

घटक- आर्थिक, सामाजिक घटक, शासनाची धोरणे आणि राजयकीय निर्णय, औद्योगिक अपघात, नैसर्गिक आपत्ती.

**३) कुटुंब न्यायालय**

कौटुंबिक न्यायालय कायदा, कायद्याचे उद्देश, कुटुंब न्यायालयाची कामकाजाची पध्दत.

**४) वेश्यांच्या पुनर्वसनातील अडचणी**

पुनर्वसनाच्या अपुऱ्या सोयी, वेश्यागृहाचे मालक-मालकीण, दलाल मोकळे राहतात, एकदा व्यवसायात आल्यावर काही करण्याची क्षमता राहत नाही. कुटुंब व गावाकडून स्वीकार होत नाही, वेश्यांना महिला वसतिगृहात ठेवण्यास चालक तयार नसतात.

**प्रश्न ५- क्षेत्रिय कार्य-** **(गुण : २०)**

**जगातील विविध देशांची लोकसंख्या आणि तेथील आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास या संदर्भातील माहिती मिळवून टिपण तयार करा.**

----------

## समाजशास्त्राची ओळख (भाग १) (SCG - 101)

### सत्र १ साठी प्रकरण क्रमांक १ ते ७

**प्र.१ समाजशास्त्र म्हणजे काय? इतर सामाजिक शास्त्रांचा समाजशास्त्राशी असलेला संबंध विशद करा (गुण : १५)**

प्रस्तावना- विविध सामाजिक शास्त्रे समाजाचा अभ्यास करतात. समाजशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. समाजशास्त्राची विचारवंतांनी केलेली व्याख्या.
समाजशास्त्र व इतर सामाजिक शास्त्रे - समाजशास्त्र व अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राज्यशास्त्र, समाजशास्त्र व इतिहास, समाजशास्त्र आणि मानसशास्त्र, समाजशास्त्र व मानववंशशास्त्र, समाजशास्त्र व तत्वज्ञान यामधील परस्परसंबंध

**प्र.२ समाज म्हणजे काय? समाजाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा. (गुण : १५)**

प्रस्तावना : 'समाज' हा शब्द रोजच्या व्यवहारात आपण नेहमी वापरतो. पण आपण हा शब्द ढिलेपणाने वापरतो. समाजाची विविध विचारवंतांनी केलेली व्याख्या.
समाजाची वैशिष्ट्ये- लोकांचा मिळून समाज, सामाजिक संबंधांमध्ये परस्पर जाणीव, साम्य आणि भेद, भेदापेक्षा ऐक्य महत्वाचे, परस्परावलंबित्व, सहकार्य, परिवर्तनशीलता, चिरस्थायित्व, सामाजिकता, केवळ लोकांचा समूह म्हणजे समाज नव्हे.

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) (गुण : १५)**

**१) सामाजिक संरचनेचे घटक लिहा.**
चार मूलभूत घटक- समूह/उपसमूह (समूहाचे प्रकार) भूमिका, सामाजिक प्रमाणके/नियमने, सांस्कृतिक मूल्ये,

**२) समाजाच्या कार्यात्मक गरजा लिहा.**
समाजधारणेसाठी आवश्यक ज्या मूलभूत गरजा आहेत त्यांना समाजाच्या कार्यात्मक गरजा म्हटले जाते. त्या गरजा-उदिष्टसिध्दी, अनुकूलन, एकीकरण, प्रतिमान रक्षण, ताण कमी करणे किंवा नाहीसा करणे.

**३) संस्कृतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**
संस्कृती हे मानवाचे वैशिष्ट्य, व्यक्तीला ती आत्मसात करावी लागते. एकाच समाजात उपसंस्कृती दिसतात, विविधता, कालमानाप्रमाणे बदलते, प्रत्येक देशाची/समाजाची संस्कृती वेगळी, संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण.

**४) सामाजिकीकरणाची माध्यमे लिहा.**
माध्यमे- कुटुंब, शाळा आणि महाविद्यालय, मित्रपरिवार आणि समवयस्कांचे गट, प्रसारमाध्यमे- वृत्तपत्रे, नभोवाणी, दूरदर्शन, चित्रपट, नाटके, पुस्तके.

**प्र.४) टीपा लिहा (कोणत्याही दोन) (गुण : १५)**

**१) समुदायाची वैशिष्ट्ये**
वैशिष्ट्ये- भौगोलिक स्थान, समुदाय भावना, नैसर्गिकता, कायम स्वरुप, समुदायाचा आकार, संबंधांचे नियंत्रण.

**२) सांस्कृतिक परिवर्तन**

समाजांतर्गत होणाऱ्या परिवर्तनामुळे, तसेच समाजाबाहेरील काही घटकांच्या प्रभावामुळे संस्कृतीमध्ये बदल होतो, पारंपरिक वर्तणुकीच्या पध्दतींना प्रत्यक्षपणे/अप्रत्यक्षपणे हादरे बसल्यास, अधिकार व्यवस्था कमकुवत झाल्यास सांस्कृतिक आदर्श आणि प्रत्यक्ष वर्तन पध्दतीत तफावत पडल्यास संस्कृतीला धक्का बसतो. इतर संस्कृतींशी संपर्क आल्यामुळे सांस्कृतिक परिवर्तन होते, सामाजिक संस्थांचे विशेषीकरण झाल्यामुळे, बाह्य शक्तीच्या प्रभावामुळे संस्कृतीचे विघटन होते.

**३) सामाजिक गतिशीलतेचे प्रकार**

उर्ध्वगामी, अधोगामी, समस्तरीय गतिशीलता

**४) लोकरुढी आणि लोकनीती**

ही दोन्ही सामाजिक नियंत्रणाची अनैपचारिक माध्यमे. दोन्हीचा अर्थ, उदाहरणे

**प्र.५) क्षेत्रिय कार्य- आपल्या समाजातील सद्य:स्थितीचे निरीक्षण करुन 'जातिव्यवस्थेची वैशिष्ट्ये' यावर टिपण तयार करा.** **(गुण : २०)**

-------------

**आपण खालीलपैकी जो एक विषय निवडलेला असेल फक्त त्याच विषयाचे गृहपाठ लिहून पाठवावेत.**

**१) आधुनिक भारत : भारताचा स्वातंत्र्यलढा (HCG - 101)**

**२) भारतीय अर्थव्यवस्था (भाग १) (ECG - 101)**

**३) राज्यशास्त्राची ओळख (भाग १) (PCG - 101)**

**४) प्राकृतिक भूगोल (भाग १) (GCG - 101)**

---

## आधुनिक भारत : भारताचा स्वातंत्र्यलढा (HCG – 101)

### (सत्र १ : अभ्यासासाठी प्रकरणे : प्रकरण क्र. १,२,४ ते ९)

**१. राष्ट्रसभेची निर्मिती कोणत्या घटकांमुळे झाली? (गुण : १५)**

**प्रस्तावना** : १८८५ साली मुंबई येथे राष्ट्रसभा या राष्ट्रीय पातळीवरील राजकीय संघटनेची स्थापना झाली.

**राष्ट्रसभेच्या स्थापनेची कारणे** - राजकीय ऐक्य, १९व्या शतकातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी, भारतीय वृत्तपत्रे आणि साहित्य यांची महत्त्वपूर्ण कामगिरी, पौर्वात्यवाद, पाश्चात्त्य शिक्षणाचा प्रभाव, इंग्रजी भाषेचा वाटा, भारताचे आर्थिक शोषण करणारे ब्रिटिश, उच्च नोक-यात भारतीयांवर अन्याय, इंग्रजांचा अहंगंड, अन्यायी लिटनशाही, इल्बर्ट बिल, जागृत प्रांतिक राजकीय संघटना

**समारोप** : या संघटनेचे स्वरूप काळाबरोबर बदलत जाऊन अधिकाधिक जहाल बनले. कल्याणकारी राज्याच्या मागणीपासून स्वातंत्र्याच्या मागणीपर्यंत आणि त्यासाठी केलेल्या नाविन्यपूर्ण संघर्षापर्यंत भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व राष्ट्रसभेने समर्थपणे केले.

**२. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील लो. टिळकांच्या योगदानाचे वर्णन करा. (गुण : १५)**

**प्रस्तावना** - जहालमतवादाच्या उदयाची कारणे ५ ते ६ वाक्यात द्यावीत.

**लो. टिळकांचे योगदान** - केसरी-मराठा, राष्ट्रीय उत्सव, रँडशाहीवर टिका, वंगभंग आंदोलन, चतु;सूत्री, ऐक्याचे प्रयत्न - लखनौ करार जहाल-मवाळ ऐक्य, काँग्रेस-लीग ऐक्य, होमरूल लीग चळवळ

**समारोप**- लो. टिळकांच्या जहाल स्वरूपाच्या कार्यामुळे राष्ट्रीय चळवळ अधिक व्यापक झाली, बळकट झाली. तिचे रुपांतर लोकचळवळीमध्ये झाले. पुढील काळात म. गांधींनी चळवळ अधिक व्यापक करताना शेतकरी, कामगार, स्त्रिया आदि जनसामान्याना त्यात सामावून घेतले.

**३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन) (गुण : १५)**

**अ) ईस्ट इंडिया कंपनीने बंगाल प्रांतावर आपले प्रभूत्व कशाप्रकारे प्रस्थापित केले?**

**प्रस्तावना** - ब्रिटिश व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले आणि राज्यकर्ते झाले. ईस्ट इंडिया कंपनी या ब्रिटिश व्यापारी कंपनीने भारतातील साम्राज्यविस्ताराची सुरुवात बंगालपासून केली.

**बंगालमधील सत्तास्थापना** - व्यापारासाठी सवलती, प्लासीची लढाई - ब्रिटिश-फ्रेंच युध्दाच्या निमित्ताने ब्रिटिश वखारीस तटबंदी, त्यास बंगालच्या नबाबाचा विरोध व प्लासीची लढाई, नबाबाचा पराभव, बक्सारची लढाई - पदच्युत नबाब, अयोध्येचा वजीर व दिल्लीचा बादशहा यांच्या विरुध्दची लढाई, त्यांचा पराभव, बंगाल, बिहार व ओरिसाची दिवाणी कंपनीला.

**समारोप** - बादशहाच्या पराभवामुळे कंपनीची बाजू जड झाली. बंगालनंतर म्हैसूरा राजा टिपू, मराठे यांचा आणि अखेरीस शीखांचा पराभव करून जवळजवळ संपूर्ण भारतावर ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता प्रस्थापित.

**आ) १८५७ च्या उठावाच्या अपयशाच्या कारणांचे वर्णन करा.**

**प्रस्तावना** : १८५७ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या विरोधात संस्थानिक, हिंदी शिपाई, जमीनदार इ. वर्गांनी व्यापक उठाव केला. ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तास्थापनेमुळे ज्या समस्या उद्भवलेल्या होत्या, भारतीयांना जे तोटे सहन करावे लागत होते त्या विरुध्दचा हा असंतोष होता. मात्र हा उठाव अपयशी झाला. कंपनीसरकारने उठाव कठोरपणे मोडून काढला.

**उठावाच्या अपयशाची कारणे** – नियोजन व एकसूत्रीपणाचा अभाव; लष्करी नेतृत्व, कौशल्य व शिस्त यातील उणेपणा; सर्वोच्च नेत्याचा अभाव, उच्च ध्येयाचा अभाव, प्रमुख हिंदी संस्थानिक व सुशिक्षित वर्ग इंग्रजांच्या बाजूने, इंग्रजांची चिकाटी व मुत्सद्देगिरी

**समारोप** : १८५७ चा उठाव जरी अपयशी झाला तरी या उठावाने भावी पिढीला प्रेरणा देण्याचे काम केले. कंपनीसरकार उठाव मोडून काढण्यात यशस्वी झाले असले तरी ईस्ट इंडिया कंपनीला भारतातील सत्ता गमवावी लागली. १८५८ च्या कायद्याने भारतावर ब्रिटिश पार्लमेंटची सत्ता प्रस्थापित झाली. भारताच्या आधुनिक इतिहासातील हा एक नवा अध्याय होता.

**इ) सत्याग्रह ही संकल्पना स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – गांधीजींचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रवेश

**सत्याग्रह** – गांधीजींनी सामाजिक सुधारणा, आर्थिक सबलीकरण व राष्ट्रीय चळवळ यांची सांगड घातली. संपूर्ण चळवळीला नैतिकतेची बैठक दिली. उच्च ध्येयाचा पुरस्कार सर्वांनीच केला. परंतु, ध्येयपूर्तीसाठीची साधनेही शुध्द असली पाहिजेत असा आग्रह गांधीजींनी धरला. त्यातूनच सत्याचा आग्रह, शत्रूबाबतही प्रेम व चळवळीचा जहाल मार्ग आणि त्यासाठी अहिंसक मार्गाचा अवलंब यावर भर देणारे जे तत्त्वज्ञान व कार्यक्रम गांधीजींनी सांगितला त्यालाच सत्याग्रह म्हणतात.

गांधीजींनी सत्याग्रहाचा वापर सर्व क्षेत्रामध्ये चळवळी उभारण्यासाठी केला.

**राजकीय क्षेत्र** – उपोषण, प्रभात फे-या, मोर्चे, असहकार, सविनय कायदेभंग इ. मार्गांचा पुरस्कार

**सामाजिक क्षेत्र** – हरिजन व गिरीजनांसाठी सेवासंघ, स्त्रियांचा समाजकारण व राजकारणातील सहभाग, तसेच श्रमप्रतिष्ठा यांचा पुरस्कार, भंगीमुक्ती चळवळ, स्वच्छता मोहीम, दारूबंदीची चळवळ

**आर्थिक क्षेत्र** – कुटीरोद्योगांचा पुरस्कार, खादी व चरखा यांचा वापर, शेतकरी व कामगार यांच्या मागण्यांसाठी सत्याग्रह

**समारोप** – सत्याग्रहाचे महत्त्व –अभिनव साधन, भारतीय स्वातंत्र्य चळवळ अधिक व्यापक झाली.

**ई) गदर पक्षाची माहिती द्या.**

**प्रस्तावना** : भारताच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्गही स्वीकारला गेला. गुप्त संघटना, शस्त्रांची निर्मिती, सरकारी खजिना व शस्त्रागार यांची लूट, ब्रिटिश अधिका-यांच्या हत्या या मार्गांनी सरकारच्या मार्गात अडथळे निर्माण करणे असे या मार्गाचे स्वरूप होते. असे प्रयत्न भारताच्या विविध भागात तसेच परदेशातही केले गेले. गदर पक्ष हा त्यापैकीच एक.

**गदर पक्ष** : अमेरिकन गिरणी कामगार शिखांची चळवळ, मंदी, अमेरिका व कॅनडात येण्यास बंदी, इतर देशवासियांच्या सरकारने उपाय योजले, पण ब्रिटिश स रकारने मात्र दखल घेतली नाही, त्यामुळे स्वातंत्र्याच्या मागणीस खतपाणी, हरदयालानी युनायटेड इंडिया लूग व इंडियन असोसिएशनची स्थापना केली, गदर वृत्तपत्र, विविध देशात कार्य, वृत्तपत्रांची महत्त्वाची भूमिका, नेते, सशस्त्र क्रांतीचा बेत, अपयश

**समारोप** : सशस्त्र क्रांतिकारी मार्गाला स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाबाबत अपयश मिळाल्याचे सकृतदर्शनी वाटते. मात्र, त्यांच्या देशप्रेमामुळे, बलिदानामुळे स्वातंत्र्याची ज्योत सतत तेवत राहिली.

४. टिपा लिहा. (कोणत्याही दोन) (गुण : १५)

**अ) राणीचा जाहीरनामा**

**प्रस्तावना** : १८५७च्या उठावामागे संस्थानिकांचा असंतोष व धार्मिक तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये विदेशी सरकारने केलेल्या हस्तक्षेपाबाबतची नाराजी ही महत्त्वाची कारणे होती. याची दखल घेऊन १८५८ मध्ये इंग्लंडच्या राणीने जाहीरनाम्या द्वारे सरकारचे नवे धोरण जाहीर केले.

**राणीचा जाहीरनामा** : पार्श्वभूमी, हेतू, प्रमुख बाबी – राज्यकारभाराचा अधिकार ब्रिटिश पार्लमेंटकडे, संस्थानिकांचे हक्क, मानमरातब व प्रतिष्ठा राखली जाईल, कंपनीने केलेले करारमदार पाळले जातील, प्रजेच्या समृध्दीसाठी सरकार प्रयत्नशील राहील, धर्माच्या बाबतीत ढवळाढवळ केली जाणार नाही, भारतीयांना नोकरीमध्ये व राज्यकारभारात अधिक संधी दिल्या जातील.

**मूल्यमापन** : जाहीरनाम्यातील वचनांची पूर्तता कधी झाली नाही. कर्झनसारख्या अधिका– यांनी त्याच्याकडे दुर्लक्षच केले.

**समारोप** : सामाजिक सुधारणांबाबत हस्तक्षेप न करण्याचे धोरण मात्र अंमलात आणले गेले. राणीच्या जाहीरनाम्याने भारतीयांच्या आकांक्षा मात्र वाढल्या.

**आ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी**

**प्रस्तावना** : राष्ट्रसभेच्या स्थापनेपूर्वी भारताच्या विविध प्रांतांमध्ये अनेक नेते जनतेच्या इच्छाआकांक्षा प्रदर्शित करण्यासाठी, त्यांच्या मागण्या सरकार दरबारी मांडण्यासाठी प्रयत्नशील होते. त्यापैकी एक म्हणजे बंगाल प्रांतातील सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे होत.

**सुरेंद्रनाथ बॅनर्जी** – आय.सी.एस. उत्तीर्ण, इंडिया असोसिएशनची स्थापना, जागृतीसाठी देशभर प्रवास, सनदी सेवा परीक्षांसाठी वय कमी करण्याच्या धोरणावर कडक टीका, बेंगाली हे वृत्तपत्र सुरू केले, त्यामार्फत सरकारी धोरणांवर टिका, राष्ट्रसभेचे दोनदा अध्यक्ष, बंगालच्या फाळणीस विरोध, बहिष्कारास पाठिंबा

**समारोप** : राष्ट्रसभेच्या पूर्वी राष्ट्रीय पातळीवरील संघटना स्थापन करण्याचे श्रेय सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांना जाते.

**इ) चितगाव शस्त्रागार धाड**

**प्रस्तावना** : राष्ट्रसभेच्या सनदशीर मार्गाखेरीज सशस्त्र मार्गानेही स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले गेले.

**चितगाव शस्त्रागार धाड** : हिंदुस्थान सोशिॲलिस्ट रिपब्लिकन असोसिएशनचा प्रभाव, चितगाव शस्त्रागारावर धाड घालण्याचा कट, नेते, स्त्रियांचा महत्त्वपूर्ण सहभाग, कट – दळणव ळण व संपर्कसाधने नष्ट करून सरकारची सत्ता खिळखिळी करणे व शस्त्रागारावर धाड, नियोजन, शस्त्रे मिळाली पण काडतुसे नाहीत. शासकीय इमारतींना आग, संपर्क तुटला, काहींचा हल्ल्यात मृत्यू, अटकव खटले, अनेकांना फाशी

**समारोप** : मूल्यमापन : सशस्त्र क्रांतिकारकांच्या प्रयत्नांना थेट यश आले नसले तरी देशप्रेमाची भावना जागती ठेवण्याचे महत्त्वाचे काम क्रांतिकारकांनी केले.

**ई) चले जाव चळवळ**

**चस्तावना** : गांधीजींनी राष्ट्रीय पातळीवर तीन आंदोलने उभारली : असहकार चळवळ, सविनय कायदेभंग, चले जाव चळवळ. पैकी चले जाव चळवळ ही शेवटची चळवळ होय.

**चले जाव चळवळ** – पार्श्वभूमी, १९४२ चे मुंबई येथील अधिवेशन, गांधीजींचा ब्रिटिशांना चले जावचा इशारा, नेत्यांची धरपकड, भूमीगत चळवळ, हरताळ, सरकारी कचे–यांवर हल्ले, खजिना लुटणे इ. घातपाती कृत्ये, ब्रिटिशविरोधी पत्रके, गुप्त रेडिओ केंद्र, प्रतिसरकारे, परिणामी स्वातंत्र्याच्या विविध योजना.

**समारोप** : चले जाव चळवळीने भारताला स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर नेऊन सोडले. या आंदोलनाने जनतेच्या मनातील असंतोषाचे आणि धाडसाचेही टोक गाठले.

**५. विद्यार्थीमित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून**
**काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व ख-या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील. (एकूण गुण : २०)**

**अ) खाली दिलेला उतारा वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (गुण : ६)**

"निःशस्त्र प्रतिकार म्हणजे काय, हे तुम्ही बरोबर समजून घेतले पाहिजे. आपल्या ध्येयप्राप्तीचा दृढनिश्चय करणे आणि तिच्या आड काही कृत्रिम अन्यायी कायदे येत असले किंवा आपल्या मार्गात काही अन्याय्य परिस्थितीचा अडथळा उत्पन्न झाला तर त्याच्याशी झगडणे, असा त्याचा अर्थ आहे. तुम्ही हे समजून घ्यावे अशी होमरूल लीगची इच्छा आहे. तुम्हांस निःशस्त्र प्रतिकार हा शब्द योजायचा नसेल, तर वाटेल तो स्वार्थत्याग करून सा शब्द योजा. पण मी दोन्ही शब्दप्रयोग एकाच अर्थाने योजीन. दांडगाईचा किंवा बेकायदेशीरपणाचा मी उपदेश करीत नाही; तर वाटेल तो स्वार्थत्याग करून आपले ध्येय गाठण्याचा निश्चय करा, असे मी सांगतो. निःशस्त्र प्रतिकार हा पूर्णपणे सनदशीर आहे. कायदेशीर आणि सनदशीर हे शब्द एकाच अर्थाचे नाहीत, हे इतिहासाने सिध्द केले आहे. जोपर्यंत कोणताही कायदा न्यायाला धरून नसेल आणि १९ व २०व्या शतकातील नीतीस अनुसरून लोकमताला धरून नसेल, जोपर्यंत तो या सर्व तत्त्वांस धरून नसेल तोपर्यंत तो कायदेशीर असला तरी सनदशीर नव्हे, हा भेद तुम्ही अगदी स्पष्टपणे समजून घेतला पाहिजे असे माझे म्हणणे आहे. 'कायदेशीरपणाने' व 'सनदशीरपणाने' ह्या शब्दांचा घोटाळा होऊ देऊ नका. तुम्ही कडक रीतीने सनदशीर मार्गाचाच अवलंब करावा असे सांगतो."

१. प्रस्तुत उतारा आपल्या पुस्तकातील आहे. तो नेमका कोणत्या पानावर आहे ते लिहा.
२. प्रस्तुत उतारा खालीलपैकी कोणाचा आहे?
अ) लो. टिळक
आ) म. गांधी
इ) ॲनी बेझंट
३. एखादा कायदा सनदशीर असण्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक असल्याचे उता-यात नमुद केले आहे?
अ) कायदा न्यायाला धरून असला पाहिजे.
आ) कायदा नीतीला धरून असला पाहिजे.
इ) कायदा लोकमताला धरून असला पाहिजे.
ई) कायदा राज्यघटनेला धरून असला पाहिजे.

**आ) खालील घटना कालानुक्रमानुसार लिहा. (गुण : ४)**

प्रस्तुत प्रश्नामध्ये दिलेल्या घटना कोणत्या साली घडल्या त्यानुसार आधी घडलेली घटना प्रथम, नंतर घडलेली घटना त्यानंतर अशाप्रकारे पुन्हा लिहून काढणे अपेक्षित आहे. उदा. :

| **प्रश्नातील घटना** | **कालानुक्रम** |
|---|---|
| १. १८५७ चा उठाव | ३. ब्रिटिशांची सत्तास्थापना |
| २. भारताची फाळणी | १. १८५७ चा उठाव |
| ३. ब्रिटिशांची सत्तास्थापना | २. भारताची फाळणी |

वर उदाहरणात दिल्याप्रमाणे खालील घटना क्रमवार लिहा.
१. असहकार चळवळ
२. बंगालची फाळणी
३. होमरूल लीग चळवळ
४. नेहरू अहवाल

**इ) तुमच्या गावातील वा जवळपासच्या भागातील कोणत्याही एका स्वातंत्र्यसैनिकाची माहिती ५० वाक्यांमध्ये खालील मुद्यांच्या आधारे लिहा. (गुण : १०)**

- नाव
- जन्म-मृत्यू
- कोणत्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये सहभाग
- कार्य

-------------

# भारतीय अर्थव्यवस्था - भाग -१ (ECG - 101)

## सत्र १ साठी प्रकरण क्रमांक १ ते ८

**प्र.१) भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा. (गुण : १५)**

उत्तर : प्रस्तावना- जगातील अर्थव्यवस्थांची विभागणी विकसीत, विकसनशील व मागास अशा तीन गटांमध्ये केली जाते. भारतीय अर्थव्यवस्था विकसनशील असून, भारतीय अर्थव्यवस्थेची पुढील वैशिष्ट्ये आढळतात.

अल्प दरडोई उत्पन्न, दारिद्रयाचे मोठे प्रमाण, प्राथमिक स्वरुपाचे व्यवसाय, लोकसंख्येची जलद वाढ, बेकारी-अर्धबेकारीचे मोठे प्रमाण, भांडवल कमतरता, निकृष्ट उत्पादकता पातळी, मागासलेले तंत्रज्ञान, संयोजन कौशल्याचा अभाव, उपलब्ध साधनसामुग्रीचा अपूर्ण वापर, आर्थिक विषमता, परावलंबित्व या सर्व मुद्यांचे विश्लेषण आवश्यक.

समारोप- वरील सर्व वैशिष्ट्ये भारतीय अर्थव्यवस्थेत आढळून येतात, म्हणून भारतीय अर्थव्यवस्था विकसनशील.

**प्र.२) जमीनविषयक सुधारणा म्हणजे काय? जमीनविषयक सुधारणांची आवश्यकता व उद्दिष्टे स्पष्ट करा. (गुण : १५)**

उत्तर : प्रस्तावना- जमीनविषयक सुधारणांची व्याख्या व स्पष्टीकरण.

आवश्यकता- दलालांचे अस्तित्व, जमीन कसण्याचा शाश्वत हक्क नव्हता, जमीनीचा लहान आकार म्हणून जमीन पडीक, उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन, जमीनीची विषम वाटणी, उत्पादकता कमी म्हणून शेतकरी गरीब, वाढती लोकसंख्या म्हणून भूमीहीनांचे मोठे प्रमाण, इ. मुद्यांचे विश्लेषण.

उद्दिष्टे- कुळसंरक्षण, शेती व्यवस्थापनात सुधारणा, उत्पादनात वाढ घडविणे, आर्थिक विषमता कमी करणे, शेतमजूरांची स्थिती सुधारणे, ग्रामीण राहणीमानात सुधारणा, दलालांचे उच्चाटन इ. मुद्यांचे विश्लेषण.

समारोप- आवश्यकता व उद्दिष्टांच्या आधारे.

**प्र.३) थोडक्यात उत्तरे द्या. (कोणतेही दोन) (गुण : १५)**

**अ) भारतीय लोकसंख्येची रचना स्पष्ट करा.**

उत्तर : प्रस्तावना- एखाद्या देशातील लोकसंख्येची रचना ही त्या देशाच्या विकासाची अवस्था स्पष्ट करण्यासाठी आवश्यक ठरते. याबाबतचे स्पष्टीकरण.

भारतीय लोकसंख्येची रचना पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल- सरासरी आयुर्मान, स्त्री-पुरुष प्रमाण, वयोगटानुसार रचना, व्यवसायानुसार रचना, ग्रामीण व शहरी लोकसंख्येचे प्रमाण, लोकसंख्येची घनता, साक्षरता प्रमाण या मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक.

समारोप- वरील रचनेच्या आधारे भारताच्या विकासाची अवस्था लक्षात येते याबाबत थोडक्यात स्पष्टीकरण.

**ब) शेतमजूरांचे प्रकार स्पष्ट करा.**

उत्तर : प्रस्तावना- शेतमजूरांची व्याख्या व स्पष्टीकरण.

प्रकार- अ) स्वत:च्या मालकीची जमीन आहे किंवा नाही यावरुन- १) भूमिधारी शेतमजूर २) भूमीहीन शेतमजूर ब) शेतमजूर व मालक यांच्यातील करारावरुन- १) संबंधित शेतमजूर २) दैनंदिन शेतमजूर याबाबतचे स्पष्टीकरण.

समारोप.

**क) दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट करा.**
उत्तर : प्रस्तावना- दारिद्र्याची व्याख्या व तिचे थोडक्यात विश्लेषण.
मूलभूत गरजांची पूर्तता न करता येणारी अवस्था म्हणजे दारिद्र्य. परंतु तांत्रिकदृष्ट्या शहरी भागातील व्यक्तीला २२०० व ग्रामीण भागातील व्यक्तीला २४०० कॅलरीज एवढा आहार न मिळणे म्हणजे दारिद्र्य याबाबतचे उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक.
समारोप.

**ड) शेतमाल किंमत स्थिरीकरणातील अडचणी सांगा.**
उत्तर : प्रस्तावना- एखाद्या वस्तूची किंमत ठरविताना उत्पादन खर्च, नफा याचा विचार करावा लागतो. मात्र शेतीमालाची किंमत ठरविताना अनेक अडचणी निर्माण होताना दिसतात.
अडचणी- शेतमालाचे अधिक्य असताना येणाऱ्या अडचणी, शेतमालाची टंचाई असताना येणाऱ्या अडचणी अशा परिस्थितीत शेती मालाच्या किंमती ठरविताना येणाऱ्या व्यावहारिक अडचणींचे विश्लेषण.
समारोप.

**प्र.४) टीपा लिहा. (कोणत्याही दोन) (गुण : १५)**
**अ) भारतीय शेतीची उत्पादकता**
उत्तर : प्रस्तावना- उत्पादकतेचा विकासाशी संबंध. उत्पादकता वाढ हे विकासाचे लक्षण.
शेतीची उत्पादकता म्हणजे शेतीची उत्पादन क्षमता. ही उत्पादकता दोन प्रकारे मोजता येते.
१) दर हेक्टरी उत्पादकता = शेतीमालाचे एकूण उत्पादन (क्विंटल) ÷ लागवडीखालील जमीन क्षेत्र (हेक्टर)
२) दर माणशी उत्पादकता = शेतीमालाचे एकूण उत्पादन (दर हेक्टरी) ÷ एकूण श्रमीक संख्या (दर हेक्टरी)
**ब) ग्रामीण बेरोजगारीची कारणे.**
उत्तर : प्रस्तावना- भारतात ग्रामीण भागात हंगामी व छुपी बेरोजगारी आढळते.
कारणे- वाढती लोकसंख्या, जलसिंचनाचा अभाव, भौगोलिक व व्यावसायिक गतीक्षमतेचा अभाव, औद्योगिकीकरणाचा अभाव, दारिद्र्य, शिक्षण-प्रशिक्षणाचा अभाव, अंधश्रद्धा, वारसा कायदे इ. मुद्यांचे विश्लेषण आवश्यक.
समारोप.

**क) जलसिंचन पद्धतीतील दोष**
उत्तर : प्रस्तावना- शेतीला कृत्रिम पाणी पुरवठ्याची आवश्यकता असते. मात्र उपलब्ध पाण्याचा वापर योग्य प्रकारे होत नाही. त्यामध्ये अनेक दोष निर्माण झालेले आहेत.
दोष- क्षमतेचा अपूर्ण वापर, सदोष पीक पद्धती, पाण्याचा अतिरिक्त वापर, अडकून पडणारे भांडवल, सदोष व्यवस्थापन इ. मुद्यांचे विश्लेषण आवश्यक.
समारोप.

**ड) शेतीच्या यांत्रिकीकरणाचे फायदे.**
उत्तर : प्रस्तावना- शेतीच्या यांत्रिकीकरणाची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण. यांत्रिकीकरणामुळे अनेक फायदे.
फायदे- कामाचा वेग वाढतो, उत्पादन खर्चात घट, मोठ्या आकाराची शेती शक्य, जनावरांचा खर्च कमी, रोजगार संधीत वाढ, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते इ. मुद्यांचे विश्लेषण आवश्यक.
समारोप.

**प्र.५) दारिद्र्य रेषेखालील तीन कुटुंबांच्या दारिद्र्याची व बेरोजगाराची कारणे शोधून त्याविषयी माहिती द्या. (उत्तराच्या सुरवातीस तिनही कुटुंब प्रमुखांची नावे, पत्त्यासह आवश्यक) (गुण : २०)**

-------------

# राज्यशास्त्राची ओळख (भाग १) (PCG - 101)

## सत्र १ साठी प्रकरण क्रमांक : १, २, ३, ४, ५, ८, ११

**गृहपाठ १. राज्यशास्त्राचा इतर समाजिकशास्त्रांशी असलेला परस्पर संबंध उदाहरणांसह स्पष्ट करा. (गुण : १५)**

उत्तराचे मुद्दे- प्रास्ताविक

राज्यशास्त्र व इतिहास यांचा परस्पर संबंध
राज्यशास्त्र व अर्थशास्त्र यांचा परस्पर संबंध
राज्यशास्त्र व समाजशास्त्र यांचा परस्पर संबंध
राज्यशास्त्र व नीतिशास्त्र यांचा परस्पर संबंध
राज्यशास्त्र व मानसशास्त्र यांचा परस्पर संबंध
राज्यशास्त्र व भूराज्यशास्त्र यांचा परस्पर संबंध
समारोप.

**गृहपाठ २. लॉकचा सामाजिक करार सिध्दांत स्पष्ट करा. (गुण : १५)**

उत्तराचे मुद्दे- प्रास्ताविक

निसर्गावस्था
सामाजिक करार
प्रतिकाराचा अधिकार
लॉकच्या सामाजिक कराराची वैशिष्ट्ये
मूल्यमापन
समारोप

**गृहपाठ ३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन) (गुण : १५)**

**अ) राज्याचे मूलभूत घटक स्पष्ट करा.**

उत्तराचे मुद्दे- प्रास्ताविक

राज्य म्हणजे काय ते थोडक्यात सांगणे
राज्याचे मूलभूत घटक-

१) लोकसंख्या- मुद्दा स्पष्ट करणे
२) भूप्रदेश- मुद्दा स्पष्ट करणे
३) शासनसंस्था- मुद्दा स्पष्ट करणे
४) सार्वभौमत्व- मुद्दा स्पष्ट करणे

समारोप.

**आ) राज्याच्या निर्मितीचा विकासवादी सिध्दांत सांगा.**

उत्तराचे मुद्दे : प्रास्ताविक

राज्याच्या निर्मितीचा विकासवादी सिध्दांत इतिहासाशी सुसंगत
कुटुंब आणि कुळ
टोळीराज्य
पूर्वेकडील साम्राज्ये
ग्रीक नगरराज्ये

रोमन साम्राज्य
सरंजामी राज्ये
राष्ट्र-राज्ये
राष्ट्रराज्याचे भवितव्य
समारोप

**इ) सार्वभौमत्व म्हणजे काय? सार्वभौमत्वाची लक्षणे (वैशिष्ट्ये) कोणती?**

मुद्दे- प्रास्ताविक
सार्वभौमत्वाची व्याख्या स्पष्ट करणे.
सार्वभौमत्वाची वैशिष्ट्ये (लक्षणे)

१) चिरकाळ टिकणारे - स्पष्टीकरण
२) निरंकुशता- स्पष्टीकरण
३) एकमेवता- स्पष्टीकरण
४) सर्वसमावेशकता- स्पष्टीकरण
५) अदेयता- स्पष्टीकरण
६) अविभाज्यता- स्पष्टीकरण

समारोप.

**ई) राज्यघटनेचे लिखित व अलिखित राज्यघटना असे केलेले वर्गीकरण स्पष्ट करुन त्यांचे गुणदोष लिहा.**

उत्तराचे मुद्दे- प्रास्ताविक
राज्यघटनेचा अर्थ-व्याख्या
लिखित राज्यघटना म्हणजे काय ते स्पष्ट करणे.
लिखित राज्यघटनेचे गुण
लिखित राज्यघटनेचे दोष
अलिखित राज्यघटना म्हणजे काय ते स्पष्ट करणे.
अलिखित राज्यघटनेचे गुण
अलिखित राज्यघटनेचे दोष
समारोप.

**गृहपाठ ४. टिपा लिहा. (कोणत्याही दोन) (गुण : १५)**

**अ) राज्यशास्त्राच्या अभ्यासाची तुलनात्मक पध्दत व प्रयोगात्मक पध्दत**

मुद्दे- प्रास्ताविक-
तुलनात्मक पध्दत- अर्थ, उदा.
प्रयोगात्मक पध्दत- अर्थ, उदा.
समारोप.

**आ) राज्याच्या निर्मितीचा पितृसत्ताक व मातृसत्ताक सिध्दांत**

मुद्दे- प्रास्ताविक
पितृसत्ताक सिध्दांत- स्पष्ट करणे
मातृसत्ताक सिध्दांत- स्पष्ट करणे
समारोप.

**इ) रुसोची सामुदायिक इहा (General Will) ही संकल्पना**

मुद्दे- प्रास्ताविक

इहेचे २ प्रकार-

२) वास्तविक इहा (Actual Will)

३) खरी इहा (Real Will)

या दोन्हीचे अर्थ-

सामुदायिक इहेचा अर्थ व वैशिष्ट्ये

समारोप

**ई) सार्वभौम सत्तेच्या मर्यादा-**

प्रास्ताविक

सार्वभौम सत्तेच्या मर्यादा-

१) नैतिक बंधने

२) घटनात्मक बंधने

३) आंतरराष्ट्रीय बंधने

समारोप.

**गृहपाठ ५.** **(गुण : २०)**

**क्षेत्रिय कार्य : तुमच्या गावांतील/शहरांतील प्रमुख आर्थिक, सामाजिक, धार्मिक संस्था कोणत्या ते सांगून तेथील राज्यसंस्था त्यांचे नियंत्रण कसे करते याची चर्चा करा. (२-३ फुलस्केप पाने)**

-------------

## प्राकृतिक भूगोल (GCG - 101)

### सत्र १ साठी प्रकरण क्रमांक १ ते ६

**प्र.१ पृथ्वीच्या अंतरंगाची आकृतीसह माहिती लिहा.** (गुण : १५)
प्रस्तावना- पृथ्वीच्या उत्पत्तीची थोडक्यात माहिती.
मुद्दे- पृथ्वीचा विस्तार, पृथ्वीच्या अंतरंगातील थर, शिलावरण, सियाल, व सिमा, प्रावरण, अर्वाचीन संकल्पना, गाभा, प्राथमिक व द्वितीय व दीर्घतरंग लहरी या सर्व मुददयाचे आकृतीसह स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**प्र.२. स्तरित खडकाविषयी सविस्तर माहिती लिहा.** (गुण : १५)
प्रस्तावना- भूपृष्ठावर उघड्या पडलेल्या खडकांची उन, वारा, पाऊस, गुरुत्वाशक्ती, विदारण क्रिया मुळे फुटतुट होते. त्यापासून खडकाचा चुरा बनतो हा चुरा नदी, हिमनदी, वारा व लाटा यांनी वाहून नेला जातो व त्याचे थरावर थर साचतात व घट्ट खडक बनतात. त्यांनाच स्तरित खडक म्हणतात.
मुद्दे- स्तरित खडकांचे गुणधर्म १) यांत्रिकरित्या तयार झालेल्या अवकांदापासून निर्माण झालेले स्तरित खडक २) रासायनिक अवसादापासून तयार झालेले स्तरित खडक, स्तरित खडकांचे गुणधर्म इत्यादी मुद्दयाचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**प्र.३. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** (गुण : १५)

**१) प्राकृतिक भूगोलाच्या शाखाची माहिती लिहा.**
प्रस्तावना- प्राकृतिक भूगोलाची व्याख्या.
मुद्दे- १) खगोलीय भूगोल २) भूरुपशास्त्र ३) हवामानशास्त्र ४) वातारवरणशास्त्र
५) महासागरशास्त्र. इत्यादी मुद्द्याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. समारोप.

**२) भूमिस्वरुपाचे श्रेणीवार वर्गीकरण करा.**
प्रस्तावना- भूकवचावर अंतर्गत व बाह्य शक्तीचा परिणाम होवून अनेक प्रकारची भूमिस्वरुपे निर्माण होतात.
प्राथमिक श्रेणीची भूमिस्वरुपे- सरोवरे, तळी, नद्या.
द्वितीय श्रेणीची भूमिस्वरुपे- पर्वत, पठारे, मैदाने, सागरी मैदाने.
तृतीय श्रेणीची भूमिस्वरुपे- टेकड्या, दऱ्या, सागरी डोह, सागरी गुहा.
या मुद्दयांचे स्पष्टीकरण
समारोप

**३) अग्निजन्य खडकांचे प्रकार स्पष्ट करा.**
प्रस्तावना- अत्यंत प्रखर उष्णतेपासून निर्माण झालेले खडक म्हणजे अग्निजन्य खडक होय.
प्रकार- पातालीय खडक, उपपातालीय खडक, बहिर्गत अग्निजन्य खडक - या प्रकारांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

**४) घड्यांचे प्रकार स्पष्ट करा.**
प्रस्तावना- कमी अधिक ताण व दाबामुळे विविध प्रकारच्या घड्या निर्माण होतात.
मुद्दे- प्रकार- समात्र वली, असमात्र वली, उपरी वली, शायी वली, उपरी प्रमोद वली, प्रच्छद वली इत्यादी प्रकारचे आकृतीसह वर्णन करणे आवश्यक.
समारोप.

**प्र.४ टिपा लिहा. (कोणतेही दोन) (गुण : १५)**

**१) खचदऱ्या**

प्रस्तावना- समोरासमोर प्रस्तभंग झाल्यानंतर जर त्या प्रस्तरभंगातील प्रक्षेप विरुद्ध दिशानी असतील तर अधोगामी हालचाल होऊन खचदऱ्या तयार होतात.

मुद्दे- व्युत्क्रमी प्रसारभंगामुळे खडक दुभंगून, खचदरीची उदाहरणे व आकृती इत्यादी मुद्याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**२) घडीचे पर्वत**

प्रस्तावना- भू- कवचातील रेषाकृती लांबलचक खळगे व भू- अभिनती यामुळेच घडींच्या पर्वताची निर्मिती झाली.

मुद्दे- घडीचे पर्वत निर्माण होतानाची परिस्थिती, मध्य भू- अभिनतीची वैशिष्ट्ये, घडीच्या पर्वतांची संकल्पना, शूशर्ट यांनी मांडलेली विभागणी या मुद्दयांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**३) रुपांतरित खडक**

प्रस्तावना- मूळ खडकावर प्रचंड दाब येवून उष्णता निर्माण होते व त्यामुळे रुपांतरित खडक निर्माण होतात.

प्रकार- औष्णिक, संगमरवर, अँथ्रासाईट, पट्टीताश्म, प्रादेशिक रुपांतरण व रुपांतरित खडकाची वैशिष्टये या मुद्दयांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**४) प्रक्रमण प्रवाह सिद्धांत**

प्रस्तावना- भूखंडाची निर्मिती व वितरण याविषयीचा सिद्धांत

मुद्दे- तीन थरात विभागणी १) ग्रॅनोडायोराईड २) ॲफिबोलाईट ३) इग्लोलाईट इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**प्रश्न ५. कार्यक्षेत्र- नेपाळ देशात नुकताच झालेला भूकंप याविषयी माहिती लिहा. (गुण : २०)**

-----------

# सत्र - २

## पर्यावरण (BA - 201)

**प्र. १ ला. पर्यावरणाची व्याख्या लिहून व्याप्ती महत्त्व स्पष्ट करा. (गुण : १५)**
प्रस्तावना : पर्यावरणाचा अभ्यास, इतर विषयाच्या अभ्यासाइतकाच महत्त्वाचा समजला जातो.
मुद्दे- पर्यावरणाची व्याख्या, व्याप्ती- अतिरिक्त लोकसंख्या समस्या, प्रदूषण समस्या, विविध घटकांच्या उपलब्धतेचे प्रमाण कमी, जागतिक स्तरावर बदल, युध्द/लढाया
महत्त्व- हवामानातील बदल, नैसर्गिक संपत्तीवर अतिरिक्त भार, दूषित वातावरण इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

**प्र. २ रा. परिसंस्थेतील उर्जाप्रवाह यावर सविस्तर माहिती लिहा. (गुण : १५)**
प्रस्तावना : उर्जा किंवा शक्तीसाधने सजीवांच्या अस्तित्वाला पूरक आणि पोषक असतात.
मुद्दे- १) जलचक्र २) कार्बन चक्र ३) प्राणवायू ४) अन्नसाखळी यासंबंधी सविस्तर माहिती लिहणे अपेक्षित
समारोप.

**प्र.३ रा. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (गुण : १५)**

**१) जैवविविधतेचे महत्त्व स्पष्ट करा.**
प्रस्तावना : जैवविविधतेचे महत्त्व जागतिक पातळीवर आणि स्थानिक पातळीवर आहे.
मुद्दे- उपभोगक्ता महत्त्व, उत्पादन महत्त्व, सामाजिक महत्त्व, नैतिक महत्त्व, सौंदर्य महत्त्व इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

**२) नैसर्गिक साधन संपत्तीचे महत्त्व स्पष्ट करा.**

प्रस्तावना : नैसर्गिक साधन संपत्तीची व्याख्या.
मुद्दे- सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी निसर्गातील सर्व घटकांना मोलाचे स्थान, नैसर्गिक घटकांचे वैशिष्ट्ये, पुर्ननिर्माण साधनसंपत्ती, पुर्ननिर्मिती साधनसंपत्ती इत्यादी मुद्दयाचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

**३) जलसंपत्तीचे स्त्रोत लिहा.**

प्रस्तावना : मनुष्य प्राण्याच्या व सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी पाण्याची उपलब्धता अत्यंत महत्वाची आहे.
मुद्दे- १) भूपृष्ठावरील पाणी २) भूपृष्ठाखालील पाणी इत्यादी मुद्द्याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

**४) पर्यावरण व मानवी आरोग्य यामधील संबंध स्पष्ट करा.**

प्रस्तावना : पर्यावरण आणि मानव याच्यात अतूट स्वरुपाचे संबंध असतात.

मुद्दे- पर्यावरणातील बदल त्याचा परिणाम मानवी आरोग्यावर, मानवी हस्तक्षेपामुळे घडलेले परिणाम, ग्रामीण भागातील पर्यावरण इत्यादी मुद्द्याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**प्र. ४ था. टिपा लिहा. (गुण : १५)**

**१) परिसंस्थेचे प्रकार.**

प्रस्तावना : परिसंस्थेची व्याख्या.

मुद्दे- प्रकार- १) वनपरिसंख्या २) गवताळ परिसंख्या ३) वाळवंट परिसंख्या ४) जल परिसंख्या इत्यादी स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**२) पर्यावरण संरक्षण कायदा.**

प्रस्तावना : पर्यावरण संरक्षण कायदा १९८३ साली भारतामध्ये अंमलात आला.

मुद्दे- समान कायद्याची गरज, प्रशासकीय यंत्रणा निर्माण करण्याची गरज, लोकसहभाग, सक्तीचे कायद्याची अंमलबजावणी, प्रशिक्षण देणे, घनकचरा संबंधी जनजागृती इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**३) कुटुंब कल्याण कार्यक्रम**

प्रस्तावना : भारतामध्ये दरवर्षी लोकसंख्येची झपाट्याने वाढ होत आहे.

मुद्दे- दारिद्र्य रेषेखाली जीवनमान, उत्पन्नाची पातळीत घट, कुटुंबाचा आकार कमी करण्यावर भर, कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे स्वरुप इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**४) प्रदूषणाची कारणे**

प्रस्तावना : प्रदूषणाची व्याख्या

मुद्दे- १) मानव निर्मित २) निसर्ग निर्मित

वरील मुद्द्यांच्या आधारे स्पष्टीकरण करावे.

समारोप.

**प्र. ५ वा. आपण राहत असलेल्या भागातील पर्यावरण अहवाल तयार करावा. (गुण : २०)**

मुद्दे- १) प्राकृतिक पर्यावरण २) सांस्कृतिक पर्यावरण ३) नैसर्गिक पर्यावरण ४) प्रदूषण

५) त्यावरील उपाययोजना

आपण राहत असलेल्या घनकचरा व्यवस्थापनासबंधी विस्तृती माहिती लिहा व निरीक्षणे नोंदवा.

-----------

# सत्रीचे विषय

## भारतातील सामाजिक समस्या (भाग २) (SC - 201)

## प्रकरण क्रमांक ७ ते ११

**प्रश्न १ बालगुन्हेगार कोणाला म्हणतात? बालगुन्हेगारीची कारणे लिहा. (गुण : १५)**
प्रास्ताविक- आधुनिक काळात प्रौढ गुन्हेगारी इतकीच बालगुन्हेगारीची समस्या गंभीर बनत आहे. परंतु भारतामध्ये बालगुन्हेगारांचे प्रमाण पाश्चात्य देशातील बालगुन्हेगारांपेक्षा कमी असल्याचे आढळते.
बालगुन्हेगार- अर्थ
कारणे- १) कुटुंब २) शेजार ३) वाईट संगत ४) चित्रपट व मनोरंजन साधने ५) बेकारी
६) गरिबी ७) गलिच्छ वस्त्या ८) शहरीकरण
समारोप.

**प्रश्न २ मादक पदार्थांच्या सेवनाची कारणे व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय स्पष्ट करा. (गुण : १५)**
प्रास्ताविक- मादक पदार्थांच्या सेवनाच्या समस्येने आज उग्र स्वरुप धारण केले आहे. तरुणांमध्ये मादक पदार्थ सेवनाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने समाज व देशाच्या दृष्टीने ती मोठी चिंतेची बाब.
मादक पदार्थांचे सेवन कारणे- मानसिक, सामाजिक, शारीरिक व इतर कारणे.
प्रतिबंधात्मक उपाय- मादक पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी या पदार्थांच्या सेवनामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांबद्दल तरुणांना समजावून सांगणे, संदेश देणे, कुटुंबात योग्य वातावरण राखणे, मुलांसमोर पालकांनी चांगले आदर्श निर्माण करावेत. शाळा-महाविद्यालयात यासंबंधी माहिती देण्यासाठी शिक्षकाची नियुक्ती करावी व त्याने सल्लागाराचे व मार्गदर्शकाचे काम करावे. समाजाच्या सर्व स्तरांवर यासंबंधी जनजागृती होणे आवश्यक.

**प्रश्न ३ पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (गुण : १५)**
**१) बालकामगारांच्या समस्येची कारणे लिहा.**
कारणे- गरज, कर्जफेड, आर्थिक चणचण, सामाजिक विषमता, शैक्षणिक मागासलेपण व पालकांचे अज्ञान, शिक्षणाच्या संधीचा अभाव, प्रौढांपेक्षा बालकामगार सोईचे, विघटीत कुटुंब, कायद्याची अंमलबजावणी नाही, हुंडा.

**२) स्त्री कामगारांची समस्या यावर टिपण तयार करा.**
अलीकडील काळात स्त्रिया विविध क्षेत्रात अर्थार्जन करताना दिसतात. स्त्री शिक्षण, स्वावलंबनाची वाढती प्रवृत्ती, गरीबी, वाढती महागाई, सामाजिक प्रतिष्ठा ही त्यामागची प्रमुख कारणे. स्त्रियांकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टिकोन, स्त्रियांमधील प्रशिक्षण कौशल्याचा अभाव, पुरुषांच्या तुलनेत शारीरिक क्षमता कमी त्यामुळे त्यांना डावलून पुरुषांना काम देण्याची प्रवृत्ती दिसून येते. अलीकडे बँक, पोस्ट व इतर प्रशासकीय सेवेत स्त्रियांना प्राधान्य दिले जाते. तेथे त्यांना न्याय मिळतो परंतु असंघटित क्षेत्रात पिळवणूक सहन करावी लागते.

**३) भ्रष्टाचाराची कारणे सांगा.**
कारणे- राज्यसत्तेचा संपूर्ण जनजीवनावरील अतिरिक्त दबाव, अधिकारांचे विकेंद्रीकरण, उपभोग वृत्ती, संपत्तीचे विषम वाटप, राज्यकर्त्यांची खोटी व अवास्तव आश्वासने, मूल्यनिष्ठेचा अभाव, मंत्र्यांमध्ये नोकरशाही व शासनाच्या ज्ञानाचा अभाव, दबावगटांची निर्मिती, आपले काम लवकर होण्यासाठी इच्छुक व्यक्ती लाच देतात, युध्दकालीन परिस्थिती, जातीयता व जमातवाद, जनतेचे अज्ञान व उदासीनता.

**४) मद्यपानाचे परिणाम स्पष्ट करा.**
परिणाम- शारीरिक, मानसिक, आर्थिक परिणाम, व्यक्तिगत कौटुंबिक, सामाजिक विघटन.

**प्रश्न ४ टिपा लिहा. (कोणत्याही दोन) (गुण : १५)**

**१) शिक्षेचे प्रकार**
कारागृह, खुले कारागृह, परिवीक्षा पध्दती, अभिवचन, पॅरोल पध्दती

**२) भ्रष्टाचाराचे प्रकार**
कमिशन/दलाली, किकबॅक, लाच देणे-घेणे

**३) मद्यपानाची कारणे**
मद्यपानामुळे श्रमपरिहार होतो, बुध्दी तल्लख होते, कार्यक्षमता वाढते यासारख्या अपसमजामुळे मद्यपान केले जाते. संगतीतून, एक फॅशन म्हणून, मानसीक वैफल्य-निराशा घालविण्यास, दुःख विसरण्यास, मनोरंजन, व्यापारातील एक अविभाज्य अंग, धार्मिक संकेत आणि मनोनियंत्रणाचा अभाव.

**४) जातिसंस्थेचे वर्तमान स्वरुप**
जातीमध्ये बदल होतो आहे. परंतु बदलाचा वेग फारसा नाही. जातीचे प्रभावक्षेत्र बदलले आहे. जाती संघटनांच्याद्वारे जातीची भावना जागरुक ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. जाती अंतर्गत संघटनात वाढ पण त्यांच्यातील परस्परावलंबन कमी.

**प्रश्न ५ क्षेत्रिय कार्य- वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेल्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील गुन्हेगारांचे वर्गीकरण करुन या गुन्ह्यांमधील कारणे लिहा. (गुण : २०)**

-----------

## समाजशास्त्राची ओळख (भाग २) (SCG - 201)

## सत्र २ साठी प्रकरण क्रमांक ८ ते १२

**प्रश्न १) श्रमविभागणी म्हणजे काय? श्रमविभागणीचे प्रकार व फायदे-तोटे सांगा. (गुण : १५)**

प्रास्ताविक- श्रमविभागणी प्राचीन काळापासून अस्तित्वात माणूस जेव्हा घर करुन रहायला लागला तेव्हा प्रथम अगदी प्राथमिक अवस्थेत त्याने श्रमविभागणीचा स्वीकार केला होता.

श्रमविभागणी अर्थ प्रकार- व्यावसायिक, प्रक्रियावार, सूक्ष्म, प्रादेशिक श्रमविभागणी- फायदे- वेळ व श्रम वाचतात. यंत्राचा वापर करता येतो. शोध लागण्याची शक्यता. भांडवलाचा पूर्ण आणि काटकसरीने वापर करता येणे शक्य. वस्तूच्या दर्जात सुधारणा. प्रशिक्षण, उत्पादन काळात बचत. तोटे- कार्यक्षमता नष्ट होते. जबाबदारीची जाणीव नष्ट. गतिक्षमतेची हानी, बेकारी, समाजावर अनिष्ट परिणाम.

**प्रश्न २) सामाजिक परिवर्तन म्हणजे काय? सामाजिक परिवर्तनास कारणीभूत ठरणाऱ्या अंत:स्थ व बहि:स्थ प्रक्रियांची माहिती द्या. (गुण : १५)**

प्रास्ताविक- मानवी समाज हा परिवर्तनशील. आधुनिक काळात हे परिवर्तन फार वेगाने घडून येत आहे. कोणताही बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे.

विचारवंतांनी सामाजिक परिवर्तनाची केलेली व्याख्या. सामाजिक परिवर्तनास कारणीभूत ठरणाऱ्या अंत:स्थ प्रक्रिया- लोकसंख्येतील संख्यात्मक व गुणात्मक फेरफार, तणाव, संघर्ष, स्पर्धा.

बहि:स्थ प्रक्रिया- भौतिक पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान, सांस्कृतिक घटक

**प्रश्न ३) थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) (गुण : १५)**

**१) विवाहाचे प्रकार लिहा.**

१) एकविवाह २) बहुविवाह- अ) बहुपत्नी विवाह आ) बहुपती विवाह- भ्रातृक, अभ्रातृक बहुपती विवाह ३) समूह विवाह

**२) धर्माची कार्ये लिहा.**

सामाजिक संघटना, मानसीक तणाव कमी करणे व मनोधैर्य वाढविणे, सामाजिक नियंत्रण

**३) शिक्षण व्यवस्थेची रचना स्पष्ट करा.**

शासनसंस्था व शैक्षणिक संस्था या घटकांनी शिक्षणव्यवस्थेची रचना बनते. शैक्षणिक संस्थांचे तीन अंतर्गत घटक- अ) शैक्षणिक संस्थेचे व्यवस्थापक आ) शिक्षक इ) विद्यार्थी

**४) राज्य अस्तित्वात येण्यासाठी आवश्यक घटक लिहा.**

लोकसमूह, भूप्रदेश, शासन व सार्वभौमत्व हे चार घटक अस्तित्वात असल्याशिवाय राज्य प्रत्यक्षात येऊ शकत नाही.

**प्रश्न ४ टीपा लिहा. (कोणत्याही दोन) (गुण : १५)**

**१) पवित्र आणि अपवित्र संकल्पना**

पवित्र- प्रत्येक धर्मात पावित्र्याच्या कल्पनेनुसार व्यवहारातील काही वस्तूंना पवित्र मानले जाते. पवित्र वस्तू ही प्रतिके. उदाहरणे. अपवित्र- निषिध्द मानलेल्या गोष्टी, व्यवहार आचरणात आणणे.

**२) सामाजिक परिवर्तन व आधुनिकीकरणातील शिक्षणाची भूमिका.**

शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन- कोणत्याही क्षेत्रातील परिवर्तनाला आवश्यक व पूरक अशी वैचारिक पार्श्वभूमी निर्माण करण्याचे कार्य शिक्षण करते. अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी लोकशिक्षण.

शिक्षण आणि आधुनिकीकरण- आधुनिक समाजात स्वत:चा स्तर सुधारण्यासाठी व्यक्ती शिक्षण घेऊन प्रयत्न करते. आधुनिकीकरणातून निर्माण झालेल्या समस्यांना तोंड देण्यासाठी शिक्षण उपयोगी. आधुनिक काळात जनसंपर्काच्या माध्यमातून बहुजन समाजाला शिक्षण.

**३) राज्यसंस्था व इतर संस्थांमधील भेद**

१) इतर संस्थांचे सदस्यत्व ऐच्छिक राज्यसंस्थेचे सदस्यत्व अनिवार्य

२) व्यक्ती एका वेळी कितीही संस्थांचे सदस्यत्व घेऊ शकते परंतु ती एका वेळी एकाच राज्याची सदस्य

३) राज्याचे सार्वभौमत्व एका विशिष्ट भूभागापुरतेच पण काही इतर संस्था जागतिक स्वरुपाच्या

४) इतर संस्थांचे कार्य एका विशिष्ट हितसंबंधाने मर्यादित राज्यसंस्थेचे कार्य व्यापक

५) इतर संस्थांचे आयुष्य राज्यसंस्थेच्या तुलनेने अल्पकालीन

६) राज्यसंस्था सार्वभौम इतर संस्थांवर राज्यसंस्थेचे नियंत्रण

**४) समाजशास्त्र व विविध व्यवसाय**

आधुनिक काळात समाजशास्त्राचा उपयोग विविध व्यवसायांसाठी. अध्यापन, उद्योगक्षेत्र, समाजसेवा क्षेत्र, वृत्तविद्या, प्रसारमाध्यमे, प्रशासकीय सेवा अशा विविध व्यवसायांसाठी समाजशास्त्राची उपयुक्तता वाढली आहे.

**प्र.५) क्षेत्रिय कार्य- आपल्या समाजातील सद्य:स्थितीचे निरीक्षण करुन 'कुटुंबव्यवस्थेचे बदलते स्वरुप' यावर निबंध लिहा. (गुण : २०)**

-----------

**आपण खालीलपैकी जो एक विषय निवडलेला असेल फक्त त्याच विषयाचे गृहपाठ लिहून पाठवावेत.**

**१) आधुनिक भारत : राजकीय, आर्थिक व सामाजिक जडणघडण (HCG - 201)**

**२) भारतीय अर्थव्यवस्था (भाग २) (ECG - 201)**

**३) राज्यशास्त्राची ओळख (भाग २) (PCG - 201)**

**४) प्राकृतिक भूगोल (भाग २) (GCG - 201)**

---

## आधुनिक भारत : राजकीय, आर्थिक व सामाजिक जडणघडण (HCG – 201)

## (सत्र २ : अभ्यासासाठी प्रकरणे : प्रकरण क्र. ३ व प्रकरण १० ते १५)

**१. दलितांच्या उध्दारासाठी डॉ. आंबेडकरांनी कोणते कार्य केले? (गुण : १५)**

**प्रस्तावना** – ब्रिटिश काळातील जातिव्यवस्था व दलितांची परिस्थिती, म. फुले, छ. शाहूमहाराज, म.गांधी यांनी दलितांसाठी केलेले कार्य याबाबत ५ ते ६ वाक्ये लिहा.

**डॉ. आंबेडकरांचे कार्य** – बहिष्कृत हितकारिणी सभा, अस्पृश्य परिषदा, महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, वेगळ्या मतदारसंघाची मागणी, पुणे करार, स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना, दलित फेडरेशनची स्थापना, रिपब्लिकन पक्षाची स्थापना, बौध्द धर्माचा स्वीकार

**समारोप** – बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे आज काय महत्त्व आहे असे तुम्हाला वाटते ते स्वत: विचार करून लिहा.

**२. जीनांनी मांडलेले १४ मुद्दे, गोलमेज परिषदा व स्वतंत्र मुस्लिम राज्याची कल्पना व मागणी या मुद्द्यांच्या अनुषंगाने भारतामध्ये अलगतावादाची वाढ कशी झाली ते लिहा. (गुण : १५)**

**प्रस्तावना** : हिंदू व मुसलमान हे भारतामध्ये खूप वर्षांपासून एकत्र राहात होते. या दोन संस्कृतींचा मिलाफ सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि स्थापत्य व कलेच्या क्षेत्रांमध्ये घडून आला. मात्र ब्रिटिश काळात या दोन समाजांमध्ये वैमनस्य निर्माण होऊन त्यातून भारत व पाकिस्तान अशा दोन देशांची निर्मिती झाली.

**अलगतावाद जीनांचे १४ मुद्दे** –

नेहरू अहवालातील राज्यघटनेच्या आराखड्यास विरोध या पार्श्वभूमीवर १४ मुद्दे, त्यात मुसलमानांना धार्मिक स्वातंत्र्य, नोकरीत पुरेसा वाटा, स्वतंत्र मतदारसंघ, घटनाबदलासाठी मुसलमानांची पूर्वसंमती, प्रांतिक पुनर्रचना करताना मुस्लिम बहुसंख्यांक प्रदेशाच्या अखंडित्वाची हमी

**गोलमेज परिषदा**– स्वतंत्र हितसंबंधांचा पाठपुरावा

**स्वतंत्र राष्ट्राची कल्पना व मागणी** – पत्रकार अब्दुल हकीम शरीर याची कल्पना, खैरी बंधुंची योजना, महम्मद इक्बाल या कवीची कल्पना, जीनांचा द्विराष्ट्रवाद, मुक्ती दिन, स्वातंत्र्याच्या विविध योजनांबाबतही हीच भूमिका,घटना परिषदेवर बहिष्कार, **जातीय दंगली**

**समारोप** : फाळणीचे तुम्हाला जाणविणारे परिणाम दोन ते तीन वाक्यात लिहा.

**३) थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन) (गुण : १५)**

**अ)भारताची आर्थिक दूरवस्था दूर होण्यासाठी भारतीय विचारवंतांनी कोणते उपाय सुचविले?** (प्रकरण ११)

**प्रस्तावना** : भारतीय विचारवंतांनी भारताच्या दारिद्र्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते भारताच्या आर्थिक समस्यांचे मूळ ब्रिटिशांचे वसाहतवादी धोरण व भारतातील संपत्तीचे होणारे नि:सारण हे होते. या समस्यांवर त्यांनी उपायही सुचविले.

**राष्ट्रवादी आर्थिक विचार** : सरकारने खर्चकपात करावी, काटकसर, बचत, भांडवली गुंतवणूक, स्वदेशी, औद्योगिकीकरण, स्वराज्य
**समारोप** : भारतीय विचारवंतानी मांडलेल्या आर्थिक विचारांमुळे भारतात आर्थिक राष्ट्रवाद विकसित झाला.

**आ) सर्वोदयाची कोणतीही चार वैशिष्ट्ये लिहा.**
**प्रस्तावना** : सर्वोदय ही विचारप्रणाली ही गांधीवादाचाच एक भाग होती.
**सर्वोदयाची वैशिष्ट्ये** : सामाजिक विषमतेस विरोध, आर्थिक विकेंद्रीकरण, श्रमप्रतिष्ठा, भूदान व ग्रामदान, परिवर्तनाचे तीन टप्पे, राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण, पक्षविरहित लोकशाही, अहिंसा व प्रेम हा पाया **(यापैकी कोणतीही चार वैशिष्ट्ये)**
**समारोप**ः सर्वोदयाच्या य़शापयशाविषयी दोन ते तीन वाक्यात लिहा.

**इ) भारतीय राज्यघटनेची कोणतीही दोन वैशिष्ट्ये लिहा.**
**प्रस्तावना**- २६ जानेवारी १९५० रोजी स्वतंत्र भारताची राज्यघटना अंमलात आली.
**भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये** : लिखित व जगातली सर्वात मोठी घटना, परिवर्तनशील व परिदृढ घटनेचे मिश्रण, सार्वभौम गणराज्य, लोकशाही, धर्मनिरपेक्ष, समाजवादी राज्य, केंद्रानुवर्ती संघराज्य, संसदीय शासन, मूलभूत अधिकार, न्यायालयीन स्वातंत्र्य, मार्गदर्शक तत्त्वे **(यापैकी कोणतीही दोन वैशिष्ट्ये)**
**समारोप**ः १९५० मध्ये लागू झालेल्या राज्यघटनेमध्ये वेळोवेळी कालानुरूप दुरुस्त्या झाल्या.

**ई) पंचशील तत्त्वे लिहा.**
**प्रस्तावना** - भारत स्वतंत्र झाल्यावर शांततामय सहजीवनाचे उद्दिष्ट ठेवून परराष्ट्रीय धोरणाची आखणी करण्यात आली.
**पंचशील तत्त्वे** - राजकीय सार्वभौमत्व व प्रादेशिक अखंडतेचा मान राखणे, अनाक्रमण व भौगोलिक सीमांचा मान, अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे, आंतरराष्ट्रीय राजकारणातील समानता व परस्पर सहकार्य, शांततामय सहजीवन
**समारोप** - नेहरूंचे हे धोरण कितपत यशस्वी झाले का ? तुमचे मत एक ते दोन वाक्यात लिहा.

४. टिपा लिहा. **(कोणत्याही दोन)** **(गुण : १५)**
**अ) ब्रिटिश काळातील स्त्रीविषयक सुधारणा (प्रकरण १२ च्या आधारे)**
**प्रस्तावना** : ब्रिटिशपूर्व काळातील स्त्रियांची परिस्थिती.
**ब्रिटिश काळातील स्त्रीविषयक सुधारणा** : सरकारने केलेले कायदे, सुधारकांनी केलेली जागृती, गांधीयुगामध्ये स्त्रियांचा चळवळींमधील व सार्वजनिक क्षेत्रातील वाढता सहभाग.
**समारोप** : ब्रिटिशकाळाच्या तुलनेत स्त्रियांची आजची परिस्थिती कशी आहे असे तुम्हाला वाटते? आपले मत थोडक्यात स्पष्ट करा.

**आ) सर सय्यद अहमदखान**
**प्रस्तावना** : मुस्लिम समाजामध्ये जागृती उशिरा व कमी प्रमाणात झाली. मुस्लिम सुधारकांमध्ये सर सय्यद अहमदखान यांचे नाव प्रकर्षाने पुढे येते.
**सर सय्यद अहमदखान** : १८५७ च्या उठावातील अनुभव, राजनिष्ठा, मुसलमानांबाबतचा संशय दूर करण्याचा प्रयत्न, शिक्षणप्रसार - मुस्लिम महाविद्यालयाची स्थापना, लेखन, राष्ट्रसभेत मुसलमानांनी सामील होऊ नये यासाठी प्रयत्न, मुस्लिम एज्युकेशन कॉन्फरन्स ची स्थापना, अँग्लो-मुस्लिम डिफेन्स असोसिएशनची स्थापना
**समारोप** : सर सय्यद अहमदखान यांच्या शैक्षणिक सुधारणांचे आजच्या काळातील महत्त्व

**इ) भारतातील शेतकरी व कामगार चळवळी**

**प्रस्तावना** – सर्वप्रथम म.फुले व नारायण मेधाजी लोखंडे यांनी शेतकरी व कामगार यांच्या स्थितीची दखल घेतली.

**शेतकरी चळवळी** – शेतक-यांच्या समस्या, शेतकरी आंदोलने – बार्डोलीचा व मुळशीचा सत्याग्रह, राष्ट्रीय सभेशी सहकार्य, किसान सभांची स्थापना, अखिल भारतीय किसान सभा

**कामगार चळवळी** – रशियातील साम्यवादी क्रांती व आंतरराष्ट्रीय कामगार संघटना यांच्या पार्श्वभूमीवर चळवळीचा विकास, अहमदाबादचा संप, आयटकची स्थापना, राष्ट्रीय लढ्यातील सहभाग, स्वतंत्र लढे व कामगार कायद्यांची निर्मिती

**समारोप** – या चळवळींचा फायदा आज शेतकरी व कामगारांना झालेला दिसतो का यावर तुम्ही स्वत: विचार करून दोन ते तीन वाक्यांमध्ये लिहा.

**ई) काश्मीर प्रश्न**

**प्रस्तावना** : जम्मू-काश्मीर हे ब्रिटिशांच्या अंकित संस्थान. पाकिस्तानच्या सीमेला लागून.

**काश्मीर प्रश्न** : या संस्थानातील बहुसंख्य जनता मुसलमान व राजा हिंदू. भारताच्या स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र राहाण्याचा निर्णय. पाकिस्तानची घुसखोरी. राजा हरिसिंगाची भारताकडे मदतीची मागणी. परिणामी काश्मीर भारताता विलीन. (पूर्ण विलीनीकरण १९५४मध्ये.) पहिल्या भारत-पाक युध्दात संघर्षाची परिणती. काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे. काश्मीरचे विघटन. विलीनीकरणानंतर काश्मीरला ३७० वे कलम लागू. १९७५ चा करार.

**समारोप** : पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानची घुसखोरी व अतिरेकी कारवाया यामुळे आजही काश्मीरचा प्रश्न अनिर्णित व नाजूक. तुम्ही यावर कोणता उपाय सूचवाल ते थोडक्यात लिहा.

**५. विद्यार्थीमित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व ख-या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील. (एकूण गुण : २०)**

**अ) खाली शेतकरी चळवळीचे नेते शरद जोशी यांचा एक उतारा दिलेला आहे तो वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (गुण : १०)**

शेतीमालाच्या किंमती कमी राखण्याची सार्वत्रिक रुढ पध्दत तशी सोपी व सरळ आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर आलेल्या नव्या (स्वदेशी) मालकांच्या शेतकऱ्यांविषयीच्या निर्दयपणावर प्रकाश टाकणारी काही उदाहरणे सहज देता येतील. १९७७ पर्यंतच्या जवळजवळ सर्व कालखंडात तूट भरुन काढण्यासाठी शेतकऱ्यांकडून सक्तीची धान्यवसुली केली गेली. शासनाकडून दिल्या जाणाऱ्या लेव्हीच्या किंमती बाजारात असणाऱ्या शेतमालाच्या किंमतीपेक्षा तेव्हा ४० ते ५० टक्क्यांनी कमी होत्या. एखाद्या वेळी शेतकऱ्यांकडे धान्य नसेल तर त्याला बाजारात (चढी) किंमत आणि लेव्हीची (कमी) किंमत या दोहोतील फरक भुर्दंड म्हणून सहन करावा लागे. कारण लेव्ही बसविलेले धान्य त्याला बाजारातील चढ्या भावाने विकत घेउन लेव्हीच्या कमी भावाने शासनास द्यावा लागे.

याबाबत सी.सुब्रमण्यम् लिहितात, 'लेव्हीची वसुली एक क्रूर प्रक्रियाच. त्यासाठी ठरवलेली किंमत ही नेहमीच ग्राहकाला फायदेशीर अशी, उत्पादकाला नव्हे.'

दुसऱ्या बाजूने असे दिसते की, भरपूर पीक आल्यामुळे जेव्हा खुल्या बाजारात शेतीमालाच्या किंमती गडगडतात, तेव्हा शेतकऱ्याला मदतीचा हात पुढे करायला हेच शासन अत्यंत नाखूष असते.

शेतकऱ्याच्या उत्पादनाला संरक्षण असे मिळतच नाही. निपाणी परिसरातील शेतकऱ्यांनी तंबाखू खूपच पिकवला तेव्हा ८ मे १९८१ रोजी केंद्रीय व्यापार राज्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना दराची हमी देणे बाजूलाच राहिले, पण किंमतींना काही आधार देण्याबाबतही शासन कसे असमर्थ आहे, याचीच पध्दतशीरपणे वकिली केली.

आणि त्याच दिवशी दुपारी केंद्रीय शेतीमंत्र्यांनी त्याच लोकसभेत मात्र मोठ्या टेचात जाहीर केले की तूट असल्यामुळे शासन चार राज्यातून गव्हाची सक्तीची लेव्ही वसूल करणार आहे!

तेव्हा टंचाईच्या काळात कमी दराने लेव्हीची वसूली आणि मुबलकतेच्या काळात शेतीमालाकडे संपूर्ण दुर्लक्ष असे हे सरकारी धोरण आहे. छाप की काटा, नाणेफेकीचा कोणताही कौल लागो शेतकऱ्यांची हार ही ठरलेलीच!

शेतीविषयक नियम हे उघड शेतकऱ्यांबाबत पक्षपात करणारे आहेत. एखादा कारखानदार जेव्हा जेव्हा आपले एखादे औद्योगिक उत्पादन परदेशी पाठवून त्याद्वारा परकीय चलन मिळवतो तेव्हा तो हीरो ठरतो, त्याचे कोडकौतुक केले जाते. इतकेच काय शासनाकडून द्रव्यसाहाय्य दिले जाउन त्याला उत्तेजन मिळते.

शेतीमालाच्या निर्यातीला मात्र नाइलाजानेच परवानगी दिली जाते आणि अशी निर्यात थांबविण्यास कसलेही किरकोळ कारण पुरते. देशातील किंमती उत्पादन खर्चापेक्षा कमी असल्या तरी निर्यातीवर निर्बंध घातले जातात. म्हणजे शेतकरी जबरदस्तीने कमी किंमतीच्या रिंगणातच कोंडला जातो. त्यातच आपली निर्यातीविषयक धोरणे इतकी चंचल नि बिनबुडाची आहेत की त्यामुळे परदेशी खरेदीदार साफ वैतागून जातात. इतकेच काय त्यांनी भारतीय निर्यातदारांशी बोलणीही थांबविली असा अनुभव आहे.

कांद्यांच्या निर्यात व्यापाराचा सत्यानाश त्यासंबंधीच्या डळमळीत निर्यात धोरणामुळे झाला. उलटपक्षी कोणत्याही वस्तूची आयात मात्र अगदी सहजपणे केली जाते. अलीकडे असे दिसू लागले आहे की, शासन आपले आयातीचे धोरण आणखीनच मजबूत बनविणार आहे. रास्त भावासाठी लढा उभारु इच्छिणाऱ्या 'भारतीय' शेतकऱ्यांशी सामना करता यावा म्हणून ते साखर, कापूस, तेल, गहू यांची परदेशातून खुल्या बाजारात खरेदी करुन त्यांचे साठे करण्याच्या प्रयत्नात आहे, म्हणजे शेतकऱ्यांची रास्त मागणी नाकारण्यासाठी परदेशांची धन करायला यांची तयारी! पण नेहमीच आधीच्या युध्दाच्या अनुभवावरुन सैन्य नवी तयारी करीत असते, या न्यायानुसार या हंगामात शेतकरीही त्याच्या आंदोलनाची दिशा बदलण्याचा संभव आहे.

तयार होणाऱ्या साखरेपैकी हिंदुस्थानात ६५ टक्के साखरेवर लेव्ही आहे. या साखरेचा जागतिक मान्यताप्राप्त उत्पादन खर्च किलोमागे ४ रुपये ३० पैसे असताना सरकार लेव्ही साखरेला २ रु. ७२ पैसे (१९८०-१९८२) प्रतिकिलो असा दर देते. गरीबांना वाजवी भावात साखर मिळावी हा या मागचा हेतू असल्याचे सांगण्यात येते. गरीबांच्या कल्याणासाठी म्हणून करण्यात येणारा हा दावा इतका हास्यास्पद आहे की त्यावर काही भाष्य करण्याची जरुरीच नाही. या संदर्भात कुठलाही माणूस शासनाला सरळसरळ एक प्रश्न विचारु शकेल- 'औषधांच्या किंमती गोरगरीबांना नुसत्या न परवडणाऱ्याच नव्हे, तर अगदी आकाशाला भिडलेल्या दिसत असताना औषधावरच का कसली लेव्ही बसविली जात नाही बरे?' केवळ औषध खरीदण्यासाठी पैसा नाही म्हणून हजारो माणसे आपल्या देशात मरतात. आपल्या देशातील १/३ खेडी नुसत्या खरजेने बरबटली आहेत आणि त्यावर सामूहिक इलाज करणे खेडुतांच्या ऐपती बाहेरचे काम आहे. तेव्हा असे म्हटले असता चूक होईल का, की जर औषध-उद्योगांचे फायदे शेतकऱ्यांना मिळतील अशी परिस्थिती असती तर शासनाने त्यावरही नक्कीच लेव्ही बसविली असती?

४. उता-यातील शरद जोशींचे विचार तुम्हाला पटतात का? आपले मत सोदाहरण स्पष्ट करा.

**आ) खालील घटना कालानुक्रमानुसार लिहा.** **(गुण : ४)**

प्रस्तुत प्रश्नामध्ये दिलेल्या घटना कोणत्या साली घडल्या त्यानुसार आधी घडलेली घटना प्रथम, नंतर घडलेली घटना त्यानंतर अशाप्रकारे पुन्हा लिहून काढणे अपेक्षित आहे. उदा. :

| **प्रश्नातील घटना** | **कालानुक्रम** |
|---|---|
| १. १८५७ चा उठाव | ३. ब्रिटिशांची सत्तास्थापना |
| २. भारताची फाळणी | १. १८५७ चा उठाव |
| ३. ब्रिटिशांची सत्तास्थापना | २. भारताची फाळणी |

वर उदाहरणात दिल्याप्रमाणे खालील घटना क्रमवार लिहा.

१. डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर

२. राज्यघटनेची अंमलबजावणी

३. भाषावार प्रांतरचनेची सुरुवात

४. पहिली सार्वत्रिक निवडणुक

**इ) विद्यार्थी मित्रांनो, आपण पुस्तकामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणाची सुरुवातीच्या काळातली उद्दिष्टे अभ्यासली. सध्याचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे परदेश दौरे हा चर्चेचा विषय आहे. पंतप्रधानांनी कोणकोणत्या देशांनी भेटी दिल्या त्या देशांची यादी करा. सुरुवातीच्या उद्दिष्टांपैकी कोणत्या उद्दिष्टांचा पाठपुरावा पंतप्रधानांच्या परदेश दौ-यांमध्ये केला गेला ते लिहा. अन्य कोणत्या मुद्यांवर श्री. मोदी यांनी भर दिलेला दिसतो? (गुण : ६)**

-----------

## भारतीय अर्थव्यवस्था (भाग २) (ECG - 201)

## सत्र २ साठी प्रकरण ९ ते १६

**प्रश्न १ औद्योगिकीकरण म्हणजे काय? औद्योगिकीकरणाचे महत्व स्पष्ट करा.** (गुण : १५)

उत्तर- प्रस्तावना- औद्योगिकीकरणाची व्याख्या व तिचे स्पष्टीकरण.

महत्व- दरडोई उत्पन्नात वाढ, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, वाढत्या मागणीची पूर्तता, शेती विकासाला प्रोत्साहन, रोजगारात वाढ, व्यापारात वाढ, करदेय क्षमतेत वाढ, अनेक सामाजिक लाभ, देशाचे संरक्षण व स्वावलंबन, अप्रत्यक्ष चालना, परकीय व्यापारातील तुटीवर उपाय इ. मुद्यांचे विश्लेषण आवश्यक. समारोप.

**प्रश्न २ रिझर्व बँकेची कार्ये स्पष्ट करा.** (गुण : १५)

उत्तर- प्रस्तावना- रिझर्व बँकेची थोडक्यात संकल्पना.

कार्ये- चलन निर्मिती, सरकारची बँक, सरकारची प्रतिनीधी, सरकारची कर सल्लागार, बँकांची बँक, परकीय चलनाचा साठा व नियंत्रण, व्यापारी बँकांचा आधार, निरसन केंद्राचे कार्य, पतपैशाचे नियमन व नियंत्रण, बँकिंग व्यवस्थेवर नियंत्रण, आकडेवारी गोळा करणे, माहिति प्रसिद्ध करणे इ. कार्यांचे स्पष्टीकरण. समारोप.

**प्रश्न ३ थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** (गुण : १५)

**अ) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची उद्दिष्टे सांगा.**

उत्तर- प्रस्तावना- सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग व्याख्या-संकल्पना.

उद्दिष्टे- औद्योगिक विकासाला चालना, सार्वजनिक नियंत्रणाची व्यवस्था, मक्तेदारीवर नियंत्रण, सरकारच्या उत्पन्नात वाढ, आर्थिक विषमता कमी करणे, मागणी-पुरवठा संतुलन, विकासाचे वातावरण तयार करणे, साधनांचा योग्य वापर करणे, भांडवल गुंतवणूकीवर नियंत्रण इ. मुद्यांचे विश्लेषण.

समारोप.

**ब) औद्योगिक उत्पादकता म्हणजे काय?**

उत्तर- प्रस्तावना- व्याख्या व संकल्पनेचे स्पष्टीकरण

श्रमाची व भांडवलाची उत्पादकता औद्योगिक क्षेत्रात महत्वाची.

१) श्रमाची उत्पादकता = उत्पादन ÷ कामगार संख्या

२) भांडवलाची उत्पादकता = उत्पादन ÷ भांडवल नग संख्या

या सुत्रांचे उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक.

समारोप.

**क) पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम करणारे घटक सांगा.**

उत्तर- प्रस्तावना- पैशाचा पुरवठा संकल्पनेचे स्पष्टीकरण, व्याख्या.

घटक- तारण उपलब्धता, समाजाची निवड, रोख निधीचे प्रमाण, वित्तीय धोरण, पैशाचा भ्रमणवेग, बँकामधील ठेवी, व्याजदर, आर्थिक विकास, व्यवहारांचे स्वरुप व प्रमाण, बँकिंग विकास, किंमत पातळी, उत्पन्नाची विभागणी इ. मुद्यांचे स्पष्टीकरण.

समारोप.

**ड) अंदाजपत्रक म्हणजे काय? अंदाजपत्रकाचे प्रकार सांगा.**

उत्तर- प्रस्तावना- अंदाजपत्रकाची व्याख्या व स्पष्टीकरण.

प्रकार- समतोल, शिलकी व तुटीचे अंदाजपत्रक या तीन प्रकारांचे स्पष्टीकरण.

समारोप.

**प्रश्न ४ टीपा लिहा (कोणत्याही दोन) (गुण : १५)**

**अ) लघु-कुटिरोद्योगांच्या समस्या**

उत्तर- प्रस्तावना- भारतासारख्या विकसनशील देशात लघु-कुटिरोद्योग महत्वाची भूमिका पार पाडतात. पण त्यांच्यापुढे अनेक समस्या आहेत.

समस्या- भांडवलाची कमतरता, कच्च्या मालाची टंचाई, जुने यंत्र-तंत्र, उत्पादकतेचा अपूर्ण वापर, विक्री व्यवस्थेचा अभाव, मोठ्या उद्योगांशी स्पर्धा, सरकारचे उदासीन धोरण, अपुऱ्या सुविधा, इ. मुद्यांचे विश्लेषण.

समारोप.

**ब) आजारी उद्योगाची लक्षणे**

उत्तर- प्रस्तावना- आजारी उद्योगांची व्याख्या- संकल्पना स्पष्टीकरण.

लक्षणे- रोख निधीची कमतरता, कच्च्या मालाचे जादा साठे, तयार मालाचे जादा साठे, उत्पादकतेचा अपूर्ण वापर, गुंतवणूकीच्या प्रमाणात मोबदला कमी, पैशातील तोटे वाढत जातात, रोखता कमी होते इ. मुद्यांचे विश्लेषण.

समारोप.

**क) औद्योगिक कलहाचे परिणाम**

उत्तर- प्रस्तावना- औद्योगिक कलह, व्याख्या, संकल्पना, स्पष्टीकरण.

परिणाम- कामगारांची आर्थिक हलाखी, उत्पादनात घट, नफा घटतो, ग्राहकांची गैरसोय, मालक-कामगार दुरावा, अविश्वास, सामाजिक परिणाम इ. मुद्यांचे विश्लेषण.

समारोप.

**ड) पतनियंत्रणाचे संख्यात्मक मार्ग.**

उत्तर- प्रस्तावना- पतनियंत्रणाची संकल्पना- स्पष्टीकरण.

पतनियंत्रणाचे दोन मार्ग आहेत- गुणात्मक व संख्यात्मक.

संख्यात्मक मार्ग- बँक दर, खुल्या बाजारातील रोख्यांची खरेदी-विक्री, राखीव निधीचे बदलते प्रमाण, इ. मुद्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक. समारोप.

**प्रश्न ५ कोणत्याही क्षेत्रातील एका कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्याची भेट घेउन, संघटनेमुळे कामगारांना झालेल्या फायद्याची माहिति मिळवा व त्यावर टिपण लिहा. (गुण : २०)**

-----------

# राज्यशास्त्राची ओळख (भाग २) (PCG - 201)

## सत्र २ साठी प्रकरण क्रमांक ६, ७, ९, १०, १२, १३, १४

**गृहपाठ १. शासनाचे तीन प्रमुख विभाग कोणते? त्यांच्या कार्यांचे वर्णन करा. (गुण : १५)**

उत्तराचे मुद्दे- प्रास्ताविक

शासनाचे ३ प्रमुख विभाग- १) कायदेमंडळ २) कार्यकारीमंडळ ३) न्यायमंडळ

१) कायदेमंडळ-

प्रमुख कार्ये-

अ) कायदे तयार करणे आ) कार्यकारीमंडळावर नियंत्रण ठेवणे इ) आर्थिक कार्य ई) न्यायविषयक कामे उ) निवडणुकीचे कार्य ऊ) इतर कार्ये

**२) कार्यकारी मंडळ-**

कार्यकारी प्रमुखांचे प्रकार-

कार्यकारी मंडळाची प्रमुख कार्ये-

अ) प्रशासकीय कार्य आ) संरक्षणविषयक कार्य इ) कायदेविषयक कार्य ई) न्यायविषयक कार्य

**३) न्यायमंडळ**

प्रमुख कार्ये-

अ) न्याय देणे आ) कायद्याचा अर्थ लावणे इ) घटनेचे रक्षण करणे ई) नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करणे उ) मुख्य कार्याधिकाऱ्यास सल्ला देणे.

समारोप.

**गृहपाठ २. संसदीय पध्दतीची वैशिष्ट्ये व गुणदोषांचे वर्णन करा. (गुण : १५)**

उत्तरांचे मुद्दे- प्रास्ताविक-

संसदीय पध्दतीची वैशिष्ट्ये-

१) खरा प्रमुख व नामधारी प्रमुख वेगवेगळे
२) मंत्रिमंडळ पध्दती
३) पक्षशिस्त
४) संयुक्त जबाबदारीचे तत्व
५) प्रत्येक मंत्र्यावर कार्यभाराची जबाबदारी
६) एकात्म मंत्रिमंडळ
७) कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ यांची परस्पर संलग्नता
८) समर्थ विरोधी पक्ष
९) प्रक्रियेसंबंधी गुप्तता
१०) मंत्रिमंडळ बरखास्ती
११) पंतप्रधानांचे मध्यवर्ती स्थान

संसदीय पध्दतीचे गुण

संसदीय पध्दतीचे दोष.

समारोप.

**गृहपाठ ३. थोडक्यात उत्तरे द्या. (कोणतेही दोन) (गुण : १५)**

**अ) ॲरिस्टॉटलचे राज्यांचे वर्गीकरण स्पष्ट करुन राज्यांचे परिवर्तन चक्राचे वर्णन करा.**

उत्तराचे मुद्दे- प्रास्ताविक

ॲरिस्टॉटलचे राज्यांचे वर्गीकरण-

२ निकष- संख्यात्मक, गुणात्मक

| **संख्यात्मक निकष** | **गुणात्मक निकष** | |
|---|---|---|
| **सत्ताधारी व्यक्ती** | **कल्याणकारी राज्य** | **विकृत प्रकार** |
| एक | राजसत्ता | हुकूमशाही |
| काही | सरंजामशाही | अल्पजनशाही |
| अनेक | लोकसत्ता | लोकशाही |

राज्यांचे परिवर्तनचक्र - समारोप.

**आ) अध्यक्षीय पध्दतीच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.**

मुद्दे- प्रास्ताविक-

अध्यक्षीय पध्दतीची वैशिष्ट्ये

१) सत्ताविभाजन

२) अध्यक्ष हाच खरा कार्यकारी प्रमुख

३) लोकांनी निवडलेला कार्यकारी प्रमुख

४) अध्यक्षाला मंत्रिमंडळ दुय्यम

५) ठराविक कालावधी

समारोप

**इ) लोकशाहीचा अर्थ सांगून गुण-दोषांची चर्चा करा.**

मुद्दे- प्रास्ताविक-

लोकशाहीचे गुण-

१) लोकेच्छेवर आधारित कल्याणकारी राज्य

२) लोकांचा सहभाग

३) समताधिष्ठित राज्य

४) व्यक्तिस्वातंत्र्यावर भर

५) शांततापूर्ण मार्गाने परिवर्तन

६) राज्य हे विकासाचे साधन

लोकशाहीचे दोष-

१) गुणांपेक्षा सवंग लोकप्रियतेवर भर

२) गुणात्मकतेपेक्षा संख्यात्मकतेवर भर

३) समतेचे तत्वज्ञान अव्यवहार्य

४) बहुसंख्यांकांच्या हुकूमशाहीचा धोका

५) धोरणातील सातत्याचा अभाव

६) जनमताच्या पाठिंब्यासाठी चुकीच्या मार्गाचा वापर

७) निवडणुक पध्दतीतील त्रुटी

८) खर्चिक शासन पध्दती

समारोप.

**ई) कल्याणकारी राज्याची व्याख्या सांगून त्यांची कार्ये स्पष्ट करा.**

मुद्दे- प्रास्ताविक-

व्याख्या-

कार्ये

१) संरक्षणात्मक कार्ये

२) नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण व मदत

३) दळणवळणाच्या व संपर्काच्या सुविधा पुरवणे

४) सार्वजनिक आरोग्य

५) व्यक्तिविकास इ.

समारोप.

**गृहपाठ ४. टिपा लिहा. (कोणतेही दोन) (गुण : १५)**

**अ) राजकीय पक्षाची कार्ये**

मुद्दे- प्रास्ताविक-

राजकीय पक्षाचा अर्थ

कार्ये- १) लोकमताचे एकत्रीकरण करणे २) शासन व जनता यांमधील दुवा

३) शासनाची निर्मिती ४) सत्तेचे शांततापूर्ण परिवर्तन करणे

५) धोरण निर्मिती करणे ६) निवडणुका लढवणे

समारोप

**आ) संघराज्य पध्दतीची वैशिष्ट्ये व गुण-दोष**

मुद्दे- प्रास्ताविक

संघराज्य पध्दतीची वैशिष्ट्ये-

१) द्विस्तरीय शासनपध्दती २) सत्तेचे घटनेने विभाजन ३) लिखित राज्यघटना

४) घटनेचे सर्वश्रेष्ठत्व ५) परिदृढ राज्यघटना ६) स्वतंत्र न्यायमंडळ

संघराज्य पध्दतीचे गुण-दोष

गुण-

१) मोठा भूप्रदेश असणाऱ्या राज्यांत उपयोगी

२) घटकराज्यांना स्वायत्तता

३) विविधतेतून एकात्मता

४) सत्तेचे विकेंद्रीकरण

५) स्थानिक लोकांना राजकीय शिक्षण

६) शासनाशी निकटता लोकांचा सहभाग वाढवते

७) आर्थिक काटकसर व समान परराष्ट्र धोरण

दोष-

१) केंद्र व घटकराज्यांमध्ये संघर्ष

२) लोकांची निष्ठा केंद्र व राज्य यांत विभागते

३) द्विस्तरीय शासन व्यवस्था-खर्चिक

४) घटनाबदल करण्याची प्रक्रिया अवघड

समारोप.

**इ) लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आवश्यक घटक-**

मुद्दे- प्रास्ताविक-

लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आवश्यक घटक-

१) नागरिकांची राजकीय जागृती

२) एकात्मता व बंधुत्वाची भावना

३) सहिष्णुता

४) विकासासाठी पुरेशा संधींची उपलब्धता

५) लोकांचा राजकीय सहभाग

६) राजकीय सहभाग वाढवण्यासाठी राजकीय शिक्षण

समारोप.

**ई) मूलभूत अधिकार व कर्तव्ये**

मुद्दे- प्रास्ताविक-

मूलभूत अधिकार म्हणजे काय?

मूलभूत अधिकारांचा राज्यघटनेत समावेश

राज्यकर्त्यांचे, शासनाचे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवरील अतिक्रमण टाळण्याकरिता मूलभूत अधिकारांचा घटनेत समावेश.

व्यक्तिविकासासाठी मूलभूत अधिकार-

कर्तव्ये-

लोकांना अधिकार माहिती असतात पण कर्तव्ये विसरतात- म्हणून हक्कांसोबत कर्तव्यांचा घटनेत समावेश- हुकूमशाही किंवा अलोकतांत्रिक व्यवस्थांत कर्तव्यांचा घटनेत उल्लेख.

समारोप.

**गृहपाठ ५. क्षेत्रिय कार्य : (गुण : २०)**

**या पुस्तकातील 'एकात्म व संघराज्यपध्दती' या शीर्षकाच्या प्रकरणांतील मुद्यांच्या आधारे- 'भारतीय संघराज्य पध्दतीची' रचना आहे की वेगळी आहे ते सांगून भारतीय संघराज्य पध्दतीबद्दलचे आपले मत सांगा. (२-३ फुलस्केप पाने)**

**किंवा**

**तुमच्या गांवातील / शहरातील प्रमुख राजकीय पक्षांच्या कार्यावर टिपण लिहा. (२-३ फुलस्केप पाने)**

-------------------

## प्राकृतिक भूगोल (भाग २) (GCG - 201)
## सत्र २ साठी

**प्रश्न १) हिमनद्यांच्या खनन कार्यामुळे निर्माण होणाऱ्या भूमिस्वरुपाचे आकृतीसह वर्णन करा. (गुण : १५)**

प्रस्तावना- हिमनदीची व्याख्या

मुद्दे : १) हिमगव्हर, २) शीर्षभेग, ३) हिमानी सरोवर, ४) हिमविवर, ५) गिरिशृंग, ६) यू-दरी, ७)लोंबत्या दऱ्या, ८) प्रस्तर पायऱ्या, ९) अंत्य खळगे, १०) मेष शिला, ११) सुळका व शेपूट इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**प्रश्न २) सागरी निक्षेपण कार्यामुळे निर्माण होणाऱ्या भूमिस्वरुपांचे आकृतीसह वर्णन करा. (गुण : १५)**

प्रस्तावना- सागरी निक्षेपण म्हणजे काय ते थोडक्यात स्पष्ट करावे.

मुद्दे - १) तरंग निर्मिती मंच, २) पुळणी, ३) उपसागरी शीर्ष पुळण, ४) भूशिर पुळण, ५) लघु पुळण, ६) सलग्न दंड, ७) वाळूचा दांडा, ८) भुबध्द द्वीप, ९) अमयाग्रभुमी, १०) किनाऱ्यावरील वाळूच्या टेकड्या, ११) मृतिका संचय व दलदली इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**प्रश्न ३) पुढील प्रश्नाची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (गुण : १५)**

**१) ज्वालामुखीचे प्रकार स्पष्ट करा.**

प्रस्तावना- ज्वालामुखीविषयी थोडक्यात माहिती लिहिणे अपेक्षित

मुद्दे- १) ढालसदृश ज्वालामुखी, २) घुमटाकृत ज्वालामुखी, ३) रक्षायुक्त ज्वालामुखी, ४) संयुक्त ज्वालामुखी इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

समारोप.

**२) रासायनिक विदारणाचे प्रकार स्पष्ट करा.**

प्रस्तावना- रासायनिक विदारणक्रियेमुळे खडकांत रासायनिक बदल घडून येतात, आणि खडकातील काही रासायनिक पदार्थाचा नाश होतो.

रासायनिक विदारणाचे प्रकार-

१) जलापघटन - खडकातील कण सुटे होण्यास मदत होते.

२) कर्बाम्ल क्रिया - जैविक आम्लामुळे खडकांना छिद्रे व फटी पडतात.

३) भस्मीकरण - खडकातील लोहयुक्त संयुगांचे भस्मीकरण होते.

४) द्रवीकरण - या क्रियेमुळे प्रस्तरातील क्षार विरघळून ते ठिसुळ बनतात.

या सर्व मुद्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आश्यक.

समारोप- खडकांच्या रासायनिक घटनेत सतत बदल होत असतात, त्यामुळे खडकातील मूळ खनिजे बदलून नविन खनिजे तयार होतात.

**३) नदीच्या संचयन कार्यामळे निर्माण होणाऱ्या भूमिस्वरुपाचे वर्णन करा.**

प्रस्तावना- प्रत्येक नदीची माल वाहून नेण्याची क्षमता ठरलेली असते, त्यापेक्षा जास्त माल नदीमध्ये जमा झाल्यास संचनयनाला सुरुवात होते व त्यामुळे भूमिस्वरुपे तयार होतात.

संचयन कार्यामुळे निर्माण होणारी भूमिस्वरुपे

१) नागमोडी वळणे व नालाकृती सरोवरे- आकृती व स्पष्टीकरण
२) पूरमैदान - आकृती स्पष्टीकरण व उदाहरण
३) पूरतट - आकृती व उदाहरणासह स्पष्टीकरण
या मुद्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप- प्रतिवर्षी येणाऱ्या पुरामुळे नदीच्या दोन्ही बाजूस गाळ जमा होतो, व तो गाळ कमी जास्त प्रमाणात जिथे साठतो त्यानुसार वेगवेगळी भूमिस्वरुपे निर्माण होतात.

**४) वाऱ्याच्या कार्यामुळे वाळवंटात निर्माण होणाऱ्या भूमिस्वरुपाचे स्पष्टीकरण करा.**
प्रस्तावना- वहन कार्याची व्याख्या.
मुद्दे- भूमिस्वरुपे- हमादा, वेग, एर्ग, दुर्भूमी, डोंगराळ वाळवंटे इत्यादी भूमिस्वरुपाचे वर्णन करणे अपेक्षित.
समारोप.

**प्रश्न ४) टीपा लिहा. (कोणतेही दोन) (गुण : १५)**
**१) नदीचे अपक्षरण चक्र**
प्रस्तावना- अपक्षरण चक्राची व्याख्या
मुद्दे- भूपृष्ठाच्या अंतस्थ हालचाली, हवामानातील बदल, या मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

**२) हिमोढ**
प्रस्तावना- हिमोढाची व्याख्या
मुद्दे- पार्श्व हिमोढ, अंत्य हिमोढ, मध्य हिमोढ, भूहिमोढ, क्रमप्रसारी हिमोढ, प्रणोद हिमोढ यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

**३) त्रिभूज प्रदेश**
प्रस्तावना-
मुद्दे- जलोढ त्रिभूज प्रदेश, नदीचा अर्ध गोलाकार, विहंग पाद, एकमुखी त्रिभूज प्रदेश, खाडीचा त्रिभूज प्रदेश इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

**४) भूबध्द दीप**
प्रस्तावना-
मुद्दे- उभयाग्रभूमी (खाजण अग्रभूमी), किनाऱ्यावरील वाळूच्या टेकड्या, मृत्तिका व दलदली इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

**प्रश्न ५) तुमच्या भागातील भौगोलिक समस्या लिहा व उपाय सुचवा. (गुण : २०)**
प्रस्तावना-
मुद्दे- १) हवामान, २) जमीन, ३) पाणी, ४) शेती, ५) वाहतूक, ६) लोकसंख्या,
७) प्रदूषण, ८) पर्यावरण
इत्यादी मुद्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.
समारोप.

-----------